सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५

# मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८

(दिनांक ३१ ऑगस्ट, २००८ पर्यंत सुधारित)

BOMBAY ACT No. LXV OF 1958

# THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958

(As modified upto 31st August, 2008)

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०११

[ किंमत रु. २६/-]

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५

# मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८

(दिनांक ३१ ऑगस्ट, २००८ पर्यंत सुधारित)

BOMBAY ACT No. LXV OF 1958

# THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958

(As modified upto 31st August, 2008)

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०११

# मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका


| उद्देशिका | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| कलमे | | | |
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | ०४ |
| २. | व्याख्या. | .. | ०४ |
| ३. | कर बसविणे. | .. | ०६ |
| ४. | कराचा भरणा. | .. | ११ |
| ४क. | वाहन, इत्यादींच्या नोंदणीच्या महिन्यापासून कर भरण्यासाठी तरतूद. | .. | १३ |
| ५. | कराधान प्रमाणपत्र देणे. | .. | १३ |
| ६. | प्रतिज्ञापनाबरोबर कर भरणे. | .. | १४ |
| ७. | जादा कराचा भरणा. | .. | १५ |
| ८. | मोटार वाहनांची मालकी, कब्जा किंवा नियंत्रण याबाबत उत्तराधिकारी होणाऱ्या व्यक्तीचे, कराची व देणे असलेल्या व्याजाची, कोणतीही असल्यास, थकबाकी भरण्याचे दायित्व. | .. | १५ |
| ८क. | कालमर्यादेत कर देण्यात न आल्यास द्यावयाचे व्याज. | .. | १६ |
| ९. | कराचा परतावा. | .. | १६ |
| १०. | ताफ्याच्या मालकांसाठी विशेष तरतूद. | .. | २० |
| १०क. | तात्पुरते परवाने घेऊन राज्यात आणलेल्या वाहतूक वाहनांवरील कर. | .. | २२ |
| ११. | कराच्या उत्पन्नाची रक्कम कोठे जमा करावयाची व तिचा उपयोग. | .. | २३ |
| १२. | कराची व व्याजाची थकबाकी, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल. | .. | २४ |
| १२क. | विवक्षित बाबतीत मोटार वाहनांच्या वापरावर निर्बंध. | .. | २४ |
| १२ख. | कर भरला नसेल तर मोटार वाहन जप्त करण्याचा व अटकावून ठेवण्याचा अधिकार. | .. | २४ |
| १३. | सूट. | .. | २५ |

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १४. | अपील. | २६ |
| १४क. | पुनरीक्षण. | २६ |
| १५. | पोलीस अधिकाऱ्याचा व मोटार वाहन विभाग अधिकाऱ्यांचा अधिकार. | २७ |
| १६. | कर व व्याज न भरता मोटार वाहन कब्जात किंवा नियंत्रणाखाली ठेवणे, अपुरे व खोटे प्रतिज्ञापन करणे, वगैरेबद्दल शास्ती. | २८ |
| १७. | इतर शास्ती. | ३० |
| १८. | अपराध आपसात मिटवणे. | ३० |
| १९. | अपराधांची न्यायचौकशी. | ३० |
| २०. | मोटार वाहनांवर पथकर, इत्यादी बसवण्यास प्रतिबंध. | ३१ |
| २१. | मक्त्यात फेरबदल | ३४ |
| २२. | सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण. | ३४ |
| २२क. | प्रत्यायोजन. | ३४ |
| २३. | नियम करण्याचा अधिकार. | ३४ |
| २४. | निरसन व व्यावृत्ती. | ३६ |
| २५. | सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याचे निरसन व व्यावृत्ती. | ३७ |
| | **पहिली अनुसूची** | ३८ |
| | **दुसरी अनुसूची** | ५१ |
| | **तिसरी अनुसूची** | ५५ |
| | **चौथी अनुसूची** | ५९ |

पृष्ठ
२६
२६
२७
२८
३०
३०
३०
३१
३४
३४
३४
३४
३६
३७
३८
५१
५५
५९

# सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५[१]

## ( मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ )

( या अधिनियमास दि. २३ ऑगस्ट, १९५८ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली; ही अनुमती **मुंबई शासनाचे राजपत्र,** भाग-चार (इंग्रजी) मध्ये दि. २९ ऑगस्ट, १९५८ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली. )

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांद्वारे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.* (१-४-१९७४)†

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७. (१०-६-१९७५) †

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६. (१-४-१९७९) †

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२. (१-४-१९८०) †

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (१-९-१९८६) †

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३. (२४-४-१९८७) †

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता **मुंबई शासनाचे राजपत्र, भाग पाच, असाधारण,** इंग्रजी पृष्ठ क्र. १५१ पहा.

* सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याचे कलम ६ खालीलप्रमाणे आहे :--

" ६. महाराष्ट्र मोटार वाहने आणि उतारू यांवरील करांमध्ये तात्पुरती वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७२ याच्या तरतुदी, त्या जेथवर त्या अधिनियमाच्या कलम ३ शी संबंधित असतील तेथवर, १ एप्रिल, १९७४ रोजी आणि त्या दिवसापासून अंमलात असण्याचे बंद होईल; आणि मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ च्या तरतुदी, कलम ३ हे महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आले असल्याप्रमाणे, उक्त कलम अंमलात असण्याचे बंद झाल्यावर, लागू होतील." सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम ११ याचे कलम ३ अंमलात असण्याचे बंद होणे.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.** (२४-४-१९८७) †

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.*** (२६-१०-१९८७) †

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (२२-४-१९८८) †

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (१-४-१९८९) †

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५. (१-४-१९९१) †

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.¶ (२३-८-१९९१) †

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.¶* (१-५-१९९४) †

सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.*¶ (१-९-१९९५) †

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.@ (१-६-१९९६) †

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. ¶S (१-१०-१९९६) †

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

** सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याचे कलम १३ खालीलप्रमाणे :--

"१३. या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी परिणामकारक करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासन, अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे कोणतेही आदेश देऊ शकेल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, असा कोणताही आदेश या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यावर काढता येणार नाही."

*** सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ६ द्वारे सन १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सात निरसित करण्यात आला.

¶ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ द्वारे सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दहा निरसित करण्यात आला.

¶* सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ४ हे, दिनांक १ मे, १९९४ पासून अंमलात आले. पहा : शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक एसटीए/१९९४-सीआर-३७/९४/कराधान-१, दिनांक ३० एप्रिल, १९९४.

*¶ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याची कलम १ ते १४ ही, दिनांक १ सप्टेंबर, १९९५ रोजी अंमलात आली. पहा : शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक एसटीए/१९९५/सीआर-५७/९५/कराधान-१, दिनांक ३० ऑगस्ट, १९९५.

@ सन १९९६चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ द्वारे सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक नऊ निरसित करण्यात आला.

¶S सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४८ द्वारे सन १९९६चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक बारा निरसित करण्यात आला. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याची कलमे १५ ते २६ ही, दिनांक १ ऑक्टोबर, १९९६ रोजी अंमलात आली. पहा : शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक एसटीए/१९९६/सीआर-७४/कराधान-१, दिनांक १२ सप्टेंबर, १९९६.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २. SS (२८-११-१९९७) †

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७. @ @ (१५-७-१९९७) †

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८. †† (१-५-२०००)

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५. @ @ @ (३१-१-२००१) †

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७. @† (२३-८-१९९१) †

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६. ††† (३०-५-२००१) †

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०. (११-८-२००३) †

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३. (२७-१२-२००५) †

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४. # (८-५-२००६) †

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२. (२३-५-२००६) †

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४. ## (१४-९-२००६) †

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५. * (२२-८-२००८) †

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

SS सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १४ द्वारे सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सोळा निरसित करण्यात आला. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २ याची कलमे ९, ११ ते १३ ही, दि. २८ नोव्हेंबर १९९७ रोजी अंमलात आलीत. आणि कलमे २ ते ५, ७ आणि ८ दि. १ डिसेंबर, १९९७ रोजी अंमलात आली. पहा : शासकीय अधिसूचना गृह विभाग क्र. एमटीए/१०९७/सीआर-१ए/ टिआरए-३, दि. २९ नोव्हेंबर, १९९७.

@@ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ३ द्वारे सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक अठ्ठावीस निरसित करण्यात आला.

†† हा अधिनियम, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्र. अर्थसंकल्प ३१.००/सीआर-९२/कराधान-१, दिनांक २८ एप्रिल, २००० द्वारे अंमलात आला.

@@@ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ५ द्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक तीन निरसित करण्यात आला.

@† सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३ द्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक अकरा निरसित करण्यात आला.

††† सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ४ द्वारे सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सोळा निरसित करण्यात आला.

# हा अधिनियम, शासकीय अधिसूचना, गृह विभाग क्र. एमटीए १००३/सीआर-१०/टीआरए-३, दिनांक ५ मे, २००६ द्वारे अंमलात आला.

# # सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ३ द्वारे सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक नऊ निरसित करण्यात आला.

* सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १६ द्वारे सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दोन निरसित करण्यात आला.

**मुंबई राज्यात मोटार वाहनांवर कर बसविण्यासंबंधीचे कायदे एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे, आणि इतर विवक्षित बाबींकरिता तरतूद करणे यांसाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यात मोटार वाहनांवर कर बसवण्यासंबंधीचे कायदे एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे, आणि इतर विवक्षित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण [१][महाराष्ट्र राज्यास ] लागू असेल.

(३) तो, दि. १ एप्रिल, १९५८ रोजी अंमलात आला आहे असे समजण्यात येईल.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात, --

[२][ (क १) "वातानुकूलित मोटार वाहन" याचा अर्थ, उतारूंच्या वाहतुकीसाठी तयार करण्यात आलेले किंवा सुयोग्य करून घेतलेले व वातानुकूलन यंत्रणा बसविलेले सार्वजनिक वाहन, असा आहे;]

(१) "कराधान प्रमाणपत्र" याचा अर्थ, ज्या दराने कर बसवण्याजोगा असेल तो दर व ज्या कालावधीसाठी कर दिलेला असेल तो कालावधी दाखवणारे, कलम ५ अन्वये दिलेले प्रमाणपत्र, असा आहे;

[३][(१क) "वाहनाची किंमत" याचा अर्थ; —

(क ) भारतामध्ये निर्मिती केलेल्या वाहनाच्या संबंधात, एकतर वाहनाचा निर्माता किंवा व्यापारी याने दिलेल्या वाहनाच्या खरेदी बीजकानुसार असलेली किंमत असा आहे, आणि त्यामध्ये मूळ निर्मितीची किंमत, उत्पादन शुल्क आणि महाराष्ट्र राज्यामध्ये देय विक्रीकर अंतर्भूत असेल; आणि

(ख) भारतामध्ये आयात केलेल्या वाहनाच्या संबंधात, वाहनाचे निर्मिती स्थळ कोणतेही असले तरी, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ याअन्वये आकारणीयोग्य मूल्यासह वाहनाची जमिनीवर उतरवल्यानंतरची किंमत असा आहे आणि त्यावर देण्यात आलेले सीमाशुल्क, आणि सीमाशुल्क विभागाने माल नोंदपत्रामध्ये आकारलेले कोणतेही जादा सीमाशुल्क भरण्यात आलेले असेल तर त्याचाही यात अंतभाव होतो;] १९६२ चा ५२.

(२) "ताफ्याचा मालक" याचा अर्थ, राज्यात वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या शंभर किंवा त्यापेक्षा अधिक वाहतूक वाहनांच्या ताफ्याचा नोंदणीकृत मालक असलेली व्यक्ती, असा आहे;

[४][(२ क १) "माल वाहन" याचा अर्थ, केवळ मालाच्या वाहतुकीसाठी वापरण्याकरिता तयार करण्यात आलेले किंवा सुयोग्य करून घेतलेले कोणतेही मोटार वाहन किंवा अशारीतीने तयार न केलेले किंवा सुयोग्य करून न घेतलेले कोणतेही मोटार वाहन जेव्हा मालाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येत असेल तेव्हा ते वाहन, असा आहे;]

---

१ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २(अ) द्वारे खंड (क १) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २(अ) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (१ **क**) दाखल करण्यात आला.

४ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ द्वारे खंड (२ क १) समाविष्ट करण्यात आला.

[१][(२ क ) "व्याज" याचा अर्थ, कलम ८ **क** अन्वये देय असलेले व्याज, असा आहे; ]

[२][(२ ख)] "मोटार वाहन" याचा अर्थ, [३][मोटार वाहन अधिनियम, १९८८] मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले मोटार वाहन, असा आहे; मग त्यात मोटार स्पिरीट वापरण्यात येत असो किंवा मोटार स्पिरीट व्यतिरिक्त अन्य इंधन वापरण्यात येत असो. १९८८ चा ५९.

(३) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

[४][ * * * ]

[५][(४) "तिमाही" याचा अर्थ, [३][मोटार वाहन अधिनियम, १९८८] अन्वये ज्या महिन्यात मोटार वाहनाची नोंदणी झाली असेल किंवा ज्या महिन्यात त्या मोटार वाहनाला नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल, त्या महिन्याच्या पहिल्या दिवसांपासून सुरू होणारा तीन महिन्यांचा कालावधी व त्यानंतरचा तीन महिन्यांचा अनुवर्ती कालावधी, असा आहे; आणि "तिमाहीस" या संज्ञेचा तदनुसार अर्थ लावण्यात येईल;] १९८८ चा ५९.

(५) "नोंदणीकृत मालक" याचा अर्थ, [३][मोटार वाहन अधिनियम, १९८८] अन्वये जिच्या नावाने मोटार वाहनाची नोंद झाली असेल ती व्यक्ती, असा आहे; १९८८ चा ५९.

[६][(५क) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची, असा आहे;]

[७][(६) "कर" याचा अर्थ, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये बसवलेला कर, असा आहे; यात या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये बसवलेल्या कोणत्याही [८][ * * * ] किंवा [९][जादा किंवा एकाच वेळी द्यावयाच्या कराचा] अंतर्भाव होतो;]

(७) "कराधान प्राधिकारी" किंवा "प्राधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे संपूर्ण राज्याकरिता किंवा कोणत्याही क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता कराधान प्राधिकारी म्हणून नेमील असा अधिकारी किंवा प्राधिकारी, असा आहे, आणि राज्य शासनाला संपूर्ण राज्याकरिता किंवा कोणत्याही क्षेत्राकरिता कराधान प्राधिकारी म्हणून एकाहून अधिक अधिकारी किंवा प्राधिकारी नेमता येतील;

:२ चा ५२.

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ (अ) द्वारे खंड (२क) समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(अ) अन्वये मूळ खंड (२क) चे पुनर्क्रमांकन करून त्याला (२ख) हा क्रमांक देण्यात आला.

[३] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ द्वारे खंड (३ क) आणि खंड (३ ख) वगळण्यात आले.

[५] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ (अ) द्वारे खंड (४) दाखल करण्यात आला.

[६] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ (अ) द्वारे खंड (५क) दाखल करण्यात आला.

[७] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २(क) अन्वये खंड (६) दाखल करण्यात आला.

[८] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २(ब) द्वारे "आणखी" हा शब्द वगळण्यात आला.

[९] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ च्या कलम २(ब) द्वारे "किंवा अतिरिक्त कर" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(७क) "कर वसुली केंद्र" याचा अर्थ, राज्य शासनाने कर आकारणीसाठी, कर बसविण्यासाठी आणि कर वसुलीसाठी स्थापन केलेले केंद्र, असा आहे;]

[२][(७ख)] "पर्यटन वाहन" याचा अर्थ, [३][मोटार वाहन अधिनियम, १९८८] मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे असलेले पर्यटन वाहन, असा आहे; १९८८ चा ५९

[४][(८) "परिवहन आयुक्त" याचा अर्थ, राज्य शासनाने परिवहन आयुक्त म्हणून नेमलेला अधिकारी, असा आहे;]

[५][(९) (मोटारींच्या) ताफ्याच्या मालकाच्या संबंधात "वर्ष" याचा अर्थ, वित्तीय वर्ष, असा आहे; आणि इतर कोणत्याही बाबतीत [३][मोटार वाहन अधिनियम, १९८८] अन्वये ज्या महिन्यात मोटार वाहनाची नोंदणी करण्यात आली असेल किंवा त्या मोटार वाहनाला नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल त्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून सुरू होणारा बारा महिन्यांचा कालावधी, असा आहे;] १९८८ चा ५९

(१०) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न दिलेले इतर शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, [३][मोटार वाहन अधिनियम, १९८८] यात त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल. १९८८ चा ५९

कर बसविणे.

**३.** (१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीन राहून, सन, १९५८ च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवसापासून राज्यात वापरात येत असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या सर्व मोटार वाहनांवर, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निश्चित केलेल्या दरांनी, परंतु पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कमाल दरांहून अधिक नसतील अशा दरांनी कर बसवण्यात येईल व वसूल करण्यात येईल :

परंतु, [६][(क)] व्यापाराच्या प्रयोजनाकरिता मोटार वाहनांच्या व्यापाऱ्याने किंवा अशा वाहनांच्या कारखानदाराने ठेवलेल्या मोटार वाहनांच्या बाबतीत @ मोटार वाहन अधिनियम, १९३९ अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने रस्त्यांवर वापरण्याची परवानगी असलेल्या मोटार वाहनांवरच फक्त कर बसवला व वसूल केला जाईल : [७][ * * * ]

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २(क) द्वारे मूळ खंड (७ क) ला (७ ख) असा क्रमांक देण्यात आला आणि त्यापूर्वी खंड (७क) दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २(ब) द्वारे खंड (७ **ख**) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ४ द्वारे "मोटार वाहन अधिनियम, १९३९" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २(ड) द्वारे खंड (८) समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ च्या कलम २ (क) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[६] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३(अ) (एक) द्वारे हा कंस व अक्षर नेहमी करिता समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[ @ आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ पहा (१९८८ चा ५९). ]

[७] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ३(अ) द्वारे "आणि (ख)" या मजकुराने प्रारंभ होणारा आणि "रकमेपेक्षा अधिक असता कामा नये" या मजकुराने समाप्त होणारा मजकूर वगळण्यात आला.

[1][परंतु आणखी असे की, [2][मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या दिवशी] आणि तेव्हापासून— १९८५ चा महा. २०.

१९८८ चा ५ (क) (खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था नसेल अशा) एखाद्या व्यक्तीकडून राज्यामध्ये वापरात असलेल्या किंवा अशा वापरासाठी ठेवलेल्या खाजगी सेवा वाहनावर, पहिल्या अनुसूचीच्या [3][* *] खंड क च्या [4][उप-खंड चार क] खाली येणाऱ्या समान वहनक्षमतेच्या वाहनाच्या संबंधात या कलमान्वये राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या दराने; आणि

१९८८ चा ५१ (ख) (खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था नसेल अशा) एखाद्या व्यक्तीकडून राज्यामध्ये वापरात असलेल्या किंवा अशा वापरासाठी ठेवलेल्या अशा, पहिल्या अनुसूचीच्या [3][* *] खंड क च्या [5][उप-खंड सात] यामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या मोटार वाहनावर (खाजगी सेवा वाहनाव्यतिरिक्त अन्य), अशा मोटार वाहनाच्या संबंधात या
१९८८ चा ५१ कलमान्वये राज्य शासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या दराच्या [6][तिप्पट दराने],

कर बसविण्यात व तो वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,

(एक) "शैक्षणिक परिसंस्था" याचा अर्थ, एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा शासनाकडून किंवा याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून अशी शैक्षणिक परिसंस्था म्हणून मान्यता देण्यात येईल अशी परिसंस्था, असा आहे;

(दोन) "खाजगी सेवा वाहन" याचा अर्थ, चालक वगळून, नऊपेक्षा अधिक व्यक्तींची ने-आण करण्यासाठी बांधणी करण्यात आलेली किंवा सुयोग्य बनविण्यात आलेली आणि अशा वाहनाच्या मालकाकडून किंवा त्याच्यावतीने, त्याच्या व्यापारासाठी किंवा व्यवसायासाठी किंवा त्या संबंधात व्यक्तींची ने-आण करण्याच्या प्रयोजनांसाठी किंवा भाड्याने किंवा मोबदल्यादाखल असेल त्याखेरीज अन्य प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारी कोणतीही ओम्नी बस, असा आहे; परंतु त्यामध्ये, केवळ पोलिसांच्या प्रयोजनासाठी किंवा राज्य शासन, आदेशाद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी, वापरण्यात येणाऱ्या मोटार वाहनाचा समावेश होणार नाही;

---

१ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ द्वारे दुसरे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

२ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २(अ) (एक) द्वारे " १ एप्रिल १९७४ रोजी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३(अ) (तीन) द्वारे " भाग एकचा" हा मजकूर नेहमीकरिता वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

४ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३ द्वारे "उपखंड चार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३(अ) द्वारे "उपखंड एक" आणि "चार" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २(अ) (दोन) (ब) द्वारे "दुप्पट दराने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) "सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था" याचा अर्थ, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, असा आहे; आणि १९५० चा ६९.

(चार) "विद्यापीठ" याचा अर्थ, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये स्थापना किंवा रचना करण्यात आलेले विद्यापीठ, असा आहे.]

[1][ * * * ]

[2][ * * * ]

[3][(१ ग) (क) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या सर्व मोटार-सायकलींवर आणि तिचाक्यांवर [4][त्यांच्या संपूर्ण आयुर्मर्यादेच्या कालावधीसाठी] पुढील दराने एकाच वेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल,—

(एक) या पोट-कलमाच्या तरतुदी अंमलात आल्याच्या दिनांकानंतर (या पोट-कलमात यानंतर ज्याचा निर्देश "उक्त दिनांक" असा करण्यात आला आहे) त्यांची नोंदणी करण्यात आली असेल त्याबाबतीत, [5][दुसऱ्या अनुसूचीच्या] भाग एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी [6][ * * * ];

(दोन) उक्त दिनांकापूर्वीच त्यांची नोंदणी करण्यात आली असेल आणि त्या वाहनांवर पोट-कलम (१) अन्वये आधीच कर भरण्यात आला असेल त्याबाबतीत, [5][दुसऱ्या अनुसूचीच्या] भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी;

[7][(तीन) जर त्यांची प्रथम नोंदणी इतर कोणत्याही राज्यात झालेली असेल आणि त्यानंतर त्यांचे हस्तांतरण महाराष्ट्र राज्यात झाल्यावर उक्त दिनांकानंतर त्यांना नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल तर, दुसऱ्या राज्यामध्ये त्यांची प्रथम नोंदणी झाल्याचा महिना विचारात घेऊन, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;]

[8][ * * * ]

[9][(ग) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था नसेल अशा एखाद्या व्यक्तीने ती राज्यामध्ये वापरत असलेल्या

---

[1] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(अ) द्वारे पोट-कलम (१क) वगळण्यात आले.

[2] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ३(ब) द्वारे पोट-कलम (१ख) वगळण्यात आले.

[3] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३(ब) द्वारे पोट-कलम (१ग) दाखल करण्यात आले.

[4] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २(१) (अ) (एक) द्वारे हा मजकूर दिनांक २६ मार्च १९८७ पासून समाविष्ट केला असल्याचे मानण्यात येईल.

[5] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(ब) (एक) (अ) द्वारे " तिसऱ्या अनुसूचीच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २(१) (अ) (दोन) द्वारे "व अशाप्रकारे आकारण्यात व गोळा करण्यात आलेला कर हा अशा मोटारसायकली आणि तिचाक्यांच्या बाबतीतील त्यांच्या संपूर्ण आयुर्मर्यादेचा कर असेल" हा मजकूर वगळण्यात आला आणि तो दिनांक २६ मार्च १९८७ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[7] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(ब) (एक) (ब) द्वारे उपखंड (तीन) दाखल करण्यात आला.

[8] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १६(अ) (एक) द्वारे खंड (ख) वगळण्यात आला.

[9] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(ब) (दोन) द्वारे खंड (ग) दाखल करण्यात आला.

किंवा तिने वापरासाठी ठेवलेल्या मोटार-सायकलीवर किंवा तिचाकीवर दुसऱ्या अनुसूचीच्या **भाग एक** किंवा **भाग दोन** मध्ये विनिर्दिष्ट केलेला एकाच वेळी द्यावयाचा कर तिप्पट दराने बसविण्यात व वसूल करण्यात येईल.]

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "मोटार-सायकल व तिचाकी" या शब्दप्रयोगामध्ये, मोटार स्कूटर, मोपेड व यंत्रशक्तीने चालविता येण्याची सोय असलेली सायकल यांचा समावेश होतो];

[१][(१घ) (क) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या सर्व मोटार गाड्यांवर [२][आणि ओम्नी बसगाड्यांवर] :--

[३][(एक) जर त्यांची नोंदणी मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९९७ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर झालेली असेल तर, तिसऱ्या अनुसूचीच्या भाग एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;] १९९८ चा महा. २.

(दोन) जर त्यांची नोंदणी उक्त दिनांकापूर्वी झालेली असेल आणि पोट-कलम (१) अन्वये त्यांच्यावरील कर आधीच भरण्यात आलेला असेल तर, [४][तिसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये] विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

[५][(तीन) जर त्यांची नोंदणी प्रथम इतर कोणत्याही राज्यात झालेली असेल आणि त्यानंतर त्यांचे महाराष्ट्र राज्यात हस्तांतरण झाल्यावर उक्त दिनांकानंतर त्यांना नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल तर, दुसऱ्या राज्यामध्ये त्यांची प्रथम नोंदणी झाल्याचा महिना विचारात घेऊन, तिसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी];

[६][अशा सर्व वाहनाच्या] आयुर्मर्यादेकरिता एकाच वेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल;

[७][ * * * ]

[८][ * * * ]

[९][(ग) खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मोटारगाडीवर किंवा ओम्नी बसगाडीवर तिसऱ्या अनुसूचीच्या **भाग एक** किंवा **भाग दोन** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एकाच वेळी द्यावयाचा कर पुढीलप्रमाणे बसविण्यात व वसूल करण्यात येईल :—

(एक) भारतात निर्मिती केलेल्या किंवा भारतात आयात केलेल्या आणि खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था नसेल अशी एखादी व्यक्ती, राज्यामध्ये वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाडीवर किंवा ओम्नी बसगाडीवर [१०][तिप्पट दराने];

---

[१] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५ द्वारे पोट-कलम (१घ) दाखल करण्यात आले.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १६(ब) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(क) (एक) (ब) द्वारे उपखंड (एक) दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) (एक) (क) द्वारे "पाचव्या अनुसूचीच्या भाग तीनमध्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) (एक) (ड) द्वारे उपखंड (तीन) दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) (एक) (अ) द्वारे "अशा सर्व मोटार गाड्यांवर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १६(ब) (दोन) द्वारे मूळ परंतुक वगळण्यात आले.

[८] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(क) (दोन) द्वारे खंड (ख) वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

[१०] सन २००६चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २ द्वारे "तिप्पट दराने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) भारतामध्ये आयात केलेल्या आणि खाजगी व्यक्ती, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, विद्यापीठ किंवा शैक्षणिक परिसंस्था असेल अशी एखादी व्यक्ती राज्यामध्ये वापरत असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार गाडीवर किंवा ओम्नी बसगाडीवर दुप्पट दराने].

[१][ * * * ]

[२][ **स्पष्टीकरण.**—या पोट-कलमामध्ये वापरण्यात आलेल्या "ओम्नी बसगाडी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जिची आसनक्षमता बारापेक्षा जास्त नाही अशी, वाहतूक वाहनाखेरीज इतर ओम्नी बसगाडी असा, आहे.]

[३][(१ङ) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, सर्व मालवाहनांवर,—

(एक) जर त्यांची नोंदणी या पोट-कलमाच्या तरतुदी अंमलात येण्याच्या दिनांकानंतर (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त दिनांक" असा केलेला आहे) झालेली असेल तर, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

(दोन) जर त्यांची नोंदणी उक्त दिनांकापूर्वी झालेली असेल आणि पोट-कलम (१) अन्वये त्यांच्यावरील कर आधीच भरण्यात आलेला असेल तर, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी;

(तीन) जर त्यांची प्रथम नोंदणी इतर कोणत्याही राज्यात झालेली असेल आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्यात त्यांचे हस्तांतरण झाल्यावर उक्त दिनांकानंतर त्यांना नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल तर, दुसऱ्या राज्यामध्ये त्यांची प्रथम नोंदणी झाल्याचा महिना विचारात घेऊन, दुसऱ्या अनूसूचीच्या भाग दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी,

अशा मालवाहनांच्या आयुर्मर्यादेकरिता एकाच वेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल :

[४][परंतु, माल वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या हलक्या मोटार वाहनांखेरीज वर निर्देशिलेल्या मोटार वाहनांच्या संबंधातील कर, पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार, नोंदणीकृत मालकाच्या विकल्पानुसार वसूल करण्यात व भरण्यात येईल.]

[५][(२) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नोंदणीकृत मालकाने किंवा मोटार वाहनाचा कब्जा किंवा नियंत्रण जिच्याकडे असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, लेखीस्वरूपात केलेल्या सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कालावधीत, त्या वाहनाचा राज्यात वापर करण्यात येणार नाही किंवा ते वापरासाठी ठेवण्यात येणार नाही असे कराधान प्राधिकाऱ्यास विहित रीतीने आगाऊ कळविले नसेल आणि असे

करावा भर

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(क) (चार) द्वारे खंड (घ) वगळण्यांत आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १६(ब) (पाच) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३(ड) द्वारे पोट-कलम (१ङ) समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम २ द्वारे विद्यमान परंतुकाऐवजी हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३(२) द्वारे पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

मोटार वाहन प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत राज्यात वापरण्यात आले नव्हते किंवा ते वापरासाठी ठेवण्यात आले नव्हते असे कराधान प्राधिकाऱ्याने विहित रीतीने प्रमाणित केले नसेल तर, तो मालक किंवा ती व्यक्ती, राज्यात अशा वाहनाचा वापर करीत असल्याचे किंवा ते वापरासाठी ठेवले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, उपरोक्तप्रमाणे आगाऊ सूचना देणे अशक्य होईल असा कोणताही अपघात, तांत्रिक दोष किंवा कोणतेही अन्य पुरेसे कारण यामुळे एखाद्या वाहनाचा वापर करणे किंवा ते वापरासाठी ठेवणे अशक्य असेल त्याबाबतीत, अशी सूचना असा अपघात झाल्याच्या किंवा असे इतर कारण घडल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीच्या आत विहित रीतीने देता येईल ] :

[1][ परंतु असे की, वाहन वापरात नसण्याचा कालावधी सुरू झाल्यानंतर किंवा, यथास्थिति मागील परंतुकात विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर कराधान प्राधिकाऱ्यास अशी सूचना मिळाली असेल आणि सूचनेत विनिर्दिष्ट केलेला संपूर्ण कालावधी सूचना मिळाल्याच्या दिनांकापूर्वी समाप्त झालेला नसेल तर, कराधान प्राधिकाऱ्यास अशी सूचना मिळाल्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी द्यावयाचा कर पूर्णपणे वसूल करता येईल आणि सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या उरलेल्या भागामध्ये मोटार वाहन राज्यात वापरण्यात आले नव्हते किंवा वापरासाठी ठेवले नव्हते असे प्रमाणपत्र विहित रीतीने देता येईल.]

[2][(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या पोट-कलमाखाली कोणतीही सूचना देण्यात आलेली नसली तरी, एखादे वाहन कोणत्याही कालावधीत राज्यात वापरण्यात आले नव्हते किंवा वापरासाठी ठेवले नव्हते याविषयी परिवहन आयुक्ताची खात्री झाली तर, प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत असे मोटारवाहन राज्यामध्ये वापरण्यात आले नव्हते किंवा ते वापरासाठी ठेवले नव्हते असे त्यास प्रमाणित करता येईल. मात्र, त्याबद्दलची कारणे त्याला लेखी नमूद करावी लागतील.]

[3][ * * * ]

कराचा भरणा. ]

**४.** (१) मोटार वाहनाचा प्रत्येक नोंदणीकृत मालक किंवा असे वाहन जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली आहे अशी कोणतीही व्यक्ती [4][कलम ३ च्या [5][पोट-कलम (१)] अन्वये बसविण्याजोगा असलेला कर दिलेल्या दरांनी आगाऊ भरील :--

---

[1] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ३(ब) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) द्वारे पोट-कलम (३) हे दिनांक १ एप्रिल १९७३ पासून समाविष्ट केले असल्याचे समजण्यात येईल.

[3] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २(२) द्वारे पोट-कलम (४) वगळण्यात आले.

[4] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४(अ) (एक) द्वारे "कलम ३" चा मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४(अ) (एक) द्वारे "पोट-कलम (१) व (१क)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(एक) दरवर्षी [१][कलम ३ [२][च्या पोट-कलम (१)] अन्वये तरतूद केलेल्या दरांनी] (ज्याचा यापुढे "वार्षिक दर" असा उल्लेख केला आहे), किंवा

[३][(दोन) प्रत्येक तिमाहीसाठी खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वार्षिक दराच्या एक-चतुर्थांश (रक्कम) अधिक [४][पोट-कलम (३)] मध्ये तरतूद केलेल्या रीतीने पूर्णांकांत केलेल्या रकमेच्या शेकडा दहा टक्के या दराने (अशारीतीने आलेल्या रकमेचा यापुढे "तिमाही दर" असा निर्देश करण्यात आला आहे), किंवा

(तीन) एकापेक्षा अधिक तिमाहींसाठी तिमाही दराच्या पटीने;]

[५][(चार) तिमाहीच्या अखेरच्या दिवशी संपणाऱ्या तिमाहीपेक्षा कमी असलेल्या कोणत्याही कालावधीसाठी,—

(क) असा कालावधी एका कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत, कराच्या वार्षिक दराच्या एक-बारांश अधिक त्याच्या २० टक्के या दराने;

(ख) असा कालावधी एका कॅलेंडर महिन्यापेक्षा अधिक असेल परंतु, दोन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत कराच्या वार्षिक दराच्या दोन-बारांश अधिक त्याच्या १५ टक्के या दराने; आणि

(ग) असा कालावधी दोन कॅलेंडर महिन्यांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत तिमाही दराने;]

[६][ * * * * ]

[७][ * * * ]

[८][(२) कलम ३ च्या यथास्थिति, पोट-कलम (**१ग**), (**१घ**) किंवा (**१ङ**) अन्वये देय असलेला एकाच वेळी द्यावयाचा कर हा,—

(क) पोट-कलमे (१ग), (१घ) आणि (१ङ) या प्रत्येकाच्या खंड (क), उप-खंड (एक) मध्ये निर्देशिलेल्या मोटार वाहनांच्या बाबतीत, नोंदणीच्या वेळी;

(ख) पोट-कलमे (१ग), (१घ) आणि (१ङ) या प्रत्येकाच्या खंड (क), उप-खंड (दोन) मध्ये निर्देशिलेल्या मोटार वाहनांच्या बाबतीत, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये ज्या कालावधीसाठी कर भरलेला असेल तो कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत; आणि

(ग) पोट-कलमे (१ग), (१घ) आणि (१ङ) या प्रत्येकाच्या खंड (क), उप-खंड (तीन) मध्ये निर्देशिलेल्या मोटार वाहनांच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्यात वाहनाला नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्याच्या वेळी,

भरण्यात येईल.]

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या अनुसूचीद्वारे "कलम ३" अन्वये राज्य शासनाने ठरवलेल्या दरांनी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४(अ) (दोन) द्वारे "कलम ३" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४(१) द्वारे मूळ खंड (दोन) ऐवजी खंड (दोन) आणि (तीन) दाखल करण्यात आले.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४(अ) (तीन) द्वारे "पोट-कलम (२)" या मूळ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ४ द्वारे "खंड (चार)" दाखल करण्यात आला.

[६] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४(अ) (दोन) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[७] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४(ब) द्वारे पोट-कलम (**१क**) वगळण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ४(क) द्वारे पोट-कलमे (**१ख**) आणि (**१ग**) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[१][(३)] [२][या कलमाखाली] [३][* * *] कोणत्याही कालावधीसाठी देणे असलेल्या कराच्या रकमेची परिगणना करताना, एक रुपयाचा ५० पैशांपेक्षा कमी असलेला भाग [४][दुर्लक्षिण्यात येईल व एक रुपयाचा ५० पैसे किंवा त्याहून] अधिक असलेला भाग एक रुपया म्हणून गणला जाईल.

वाहन इत्यादीच्या नोंदणीच्या महिन्यापासून कर भरण्यासाठी तरतूद

[५][**४क.** मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही मोटार वाहनांच्या संबंधात कोणताही कर भरण्यात आला असेल आणि अशा प्रारंभापासून [६][मोटार वाहन अधिनियम, १९८८] अन्वये ज्या महिन्यात अशा वाहनाची नोंदणी करण्यात आली असेल किंवा त्याला नवीन नोंदणी चिन्ह नेमून देण्यात आले असेल त्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून त्या वाहनाच्या संबंधात कर भरण्याचे दायित्व निर्माण होईल किंवा निर्माण झाले असेल त्याबाबतीत, कलम ४, पोट-कलम (१) चा खंड (दोन), (तीन) किंवा यथास्थिति, खंड (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, ज्या कालावधीसाठी कोणताही कर भरण्यात आला नसेल त्या कालावधीसाठी अशा वाहनाच्या संबंधात कर भरण्यात येईल. तो कर विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या आत भरण्यात येईल.]

१९७२ चा महा. ३७

१९८८ चा ५९

[११][ * * ] कराधान प्रमाणपत्र देणे.

**५.** (१) जेव्हा कोणत्याही मोटार वाहनाबाबत कलम ३ अन्वये बसवण्याजोगा कर भरण्यात आला असेल तेव्हा, कराधान प्राधिकारी कर भरणाऱ्या व्यक्तीस,—

(क) असा कर भरण्यात आला आहे असे दर्शविणारी विहित नमुन्यात असलेली एक [७][पावती] देईल, आणि

(ख) [८][मोटार वाहनाची भारतात निर्मिती करण्यात आलेली असो किंवा, भारताबाहेरील कोणत्याही अन्य ठिकाणी निर्मिती करण्यात आलेली असो, त्या वाहनावर ] ज्या दराने कर बसविण्याजोगा आहे तो दर [९][व ज्या विनिर्दिष्ट कालावधीसाठी किंवा यथास्थिति, [१०][ * * * ] वाहनाच्या आयुर्मर्यादेच्या कालावधीसाठी ] कर भरण्यात आला असेल तो कालावधी दर्शविणारे कराधान प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यात देईल.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४(ड) द्वारे पोट-कलमाला नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४(ड) द्वारे "पोट-कलम (१) खाली" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ द्वारे "एका वर्षापेक्षा कमी" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ५ द्वारे कलम ४क समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ७ द्वारे "मोटार वाहन अधिनियम, १९३९" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ६(अ) द्वारे "प्रतीक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ५ द्वारे "व ज्या कालावधीसाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५ द्वारे "मोटार सायकल किंवा तिचाकी यांच्याबाबत" हा मजकूर वगळण्यात आला.

[११] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ७(१) द्वारे "कर प्रतीक व" हा मजकूर वगळण्यात आला.

(२) जेथे अशा मोटार वाहनाबाबत आधीच कराधान प्रमाणपत्र देण्यात आले असेल तेथे, कराधान प्राधिकारी, पूर्वोक्त कर भरल्यावर, अशा कराधान प्रमाणपत्रात असा कोणत्याही भरणा केल्याबद्दलची नोंद करील.

प्रतिज्ञापनाबरोबर कर भरणे.

**६.** (१) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार वाहनाच्या प्रत्येक नोंदणीकृत मालक किंवा जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली वाहन असेल ती प्रत्येक व्यक्ती, पोट-कलम (४) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने प्रतिज्ञापन भरून त्यावर सही करील व ते सुपूर्द करील आणि त्या व्यक्तीने अशा प्रतिज्ञापनाबरोबर, अशा वाहनाबाबत अशा प्रतिज्ञापनावरून जो कर भरण्यास ती पात्र असल्याचे दिसून येईल तो कर, कराधान प्राधिकाऱ्याकडे भरील :

[१][परंतु, असे प्रतिज्ञापन या राज्यामध्ये प्रवेश करणाऱ्या मालवाहू वाहनांच्या संबंधात देय असलेल्या करासोबत या राज्यामध्ये प्रवेश करण्याच्या ठिकाणाच्या निकटतम कर वसुली केंद्रावर देण्यात येईल.]

(२) या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, जेव्हा राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार वाहनात, अशा वाहनाचा नोंदणीकृत मालक किंवा जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली वाहन आहे ती व्यक्ती, कलम ७ अन्वये जादा कर भरण्यास पात्र ठरेल, अशा रीतीने फेरफार करील, किंवा त्याचा वापर करण्याचे योजिल तेव्हा, असा मालक किंवा अशी व्यक्ती पोट-कलम (४) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने अतिरिक्त प्रतिज्ञापन भरून व त्यावर सही करून ते सुपूर्द करील; व अशा अतिरिक्त प्रतिज्ञापनाबरोबर (अशा मोटार वाहनाबाबतचे [२][ * * * ] कराधान प्रमाणपत्र सोबत जोडून) अशा वाहनाबाबत अशा अतिरिक्त प्रतिज्ञापनावरून जो जादा कर भरण्यास पात्र असल्याचे दिसून येईल असा त्या कलमान्वये भरावयाचा जादा कर, कराधान प्राधिकाऱ्याकडे भरील.

(३) असा मालक किंवा अशी व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये कर किंवा पोट-कलम (२) अन्वये जादा कर भरण्याच्या वेळी [३][ मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या प्रकरण अकरा ] यातील आवश्यक गोष्टीस अनुसरून, अशा वाहनाबाबत दिलेले विम्याचे वैध प्रमाणपत्र, कराधान प्राधिकाऱ्यापुढे सादर करील. १९८८ चा ५९.

(४) पोट-कलम (१) खालील प्रतिज्ञापन व पोट-कलम (२) खालील अतिरिक्त प्रतिज्ञापन विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे असेल, त्यात विहित केलेला तपशील असेल आणि ते योग्यरीतीने भरून त्यावर सही केल्यानंतर ते विहित केलेल्या मुदतीच्या आत [४][ (कराधान प्रमाणपत्रासह) सुपूर्द करण्यात येईल.] अतिरिक्त प्रतिज्ञापनात मोटार वाहनात केलेल्या फेरफाराचे, किंवा यथास्थिति, वाहनाचा जो वेगळा वापर करण्याचे योजिले असेल त्या वापराचे स्वरूपही स्पष्टपणे दर्शविले असेल.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ६ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ७ (१) द्वारे "कर प्रतीक व" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ८ द्वारे "मोटार वाहन अधिनियम, १९३९, प्रकरण आठ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३ (अ) द्वारे "स्वाधीन केले पाहिजे." या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(५) फेरफार केलेल्या कोणत्याही मोटार वाहनाच्या बाबतीत, कराधान प्रमाणपत्रासह अतिरिक्त प्रतिज्ञापन मिळाल्यावर कराधान प्राधिकाऱ्यास कराच्या बदललेल्या दराची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, तो याबाबत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याकडून त्या वाहनाची तपासणी करून घेता येईल. कराधान प्राधिकाऱ्यास मिळालेल्या तपासणी अहवालाच्या आधारे, त्यास अशा फेरफार केलेल्या वाहनाच्या बाबतीत देय असणाऱ्या कराचा बदललेला दर निर्धारित करता येईल.

(६) जादा कर मिळाल्यावर कराधान प्राधिकारी [२][जादा कराच्या संबंधात पावती देईल] आणि कराधान प्रमाणपत्रात आपल्या सहीने व दिनांक घालून यथोचितरीत्या सुधारणा करील.]

जादा कराचा भरणा.

**७.** ज्या कोणत्याही मोटार वाहनाबाबत कोणत्याही कालावधीसाठी कर भरण्यात आला असेल अशा कोणत्याही मोटार वाहनात अशा कालावधीत, ते वाहन उच्चतर दराने कर देण्यास पात्र ठरेल अशा रीतीने फेरफार करण्यात आला असेल किंवा अशा रीतीने अशा कालावधीत त्याचा वापर करण्याचे योजिले असेल तर, अशा वाहनाचा नोंदणीकृत मालक किंवा ते वाहन जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असेल ती व्यक्ती, वाहनात फेरफार करण्यात आल्यापासून किंवा त्याचा वापर करण्याचे योजल्यापासून अशा कालावधीतील उर्वरित भागासाठी उच्चतर दराने देय असलेल्या कराची रक्कम व ज्या कालावधीतील भागासाठी वाहनात फेरफार किंवा त्याचा वापर करण्यापूर्वी त्या कालावधीसाठी ज्या दराने कर देण्यात आला होता तो दर यांमधील फरकाच्या रकमेइतका जादा कर भरेल. [३][ * * * ]

मोटार वाहनांची मालकी, कब्जा किंवा नियंत्रण याबाबत उत्तराधिकारी होणाऱ्या व्यक्तीचे कराची [५][व देणे असलेल्या व्याजाची], कोणतीही असल्यास, थकबाकी भरण्याचे दायित्व.

१९८८ चा ५९.

**८.** (१) जर कोणत्याही मोटार वाहनाबाबत बसवण्याजोगा कर, तो भरण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने भरलेला नसेल व अशा व्यक्तीने तो कर भरण्यापूर्वी अशा वाहनाची मालकी हस्तांतरित केली असेल किंवा अशा वाहनाचा कब्जा किंवा नियंत्रण तिच्याकडे असण्याचे बंद झाले असेल तर, ज्या व्यक्तीकडे त्या वाहनाची मालकी हस्तांतरित केली असेल किंवा ज्या व्यक्तीकडे अशा वाहनाचा कब्जा किंवा नियंत्रण असेल ती व्यक्तीसुद्धा कराधान प्राधिकाऱ्याकडे उक्त कर [४][व देणे असलेले व्याज कोणतेही असल्यास], भरण्यास पात्र असेल.

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, ज्या व्यक्तीने अशा वाहनाची मालकी हस्तांतरित केली असेल किंवा अशा वाहनाचा कब्जा किंवा नियंत्रण तिच्याकडे असण्याचे बंद झाले असेल त्या व्यक्तीच्या, असा कर [४][व देणे असलेले व्याज, कोणतेही असल्यास] भरण्याच्या दायित्वास बाध येतो असे मानले जाणार नाही.

---

[१] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३ (ब) द्वारे मूळ पोट-कलम (५) ऐवजी (५) व (६) ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ७ (२) द्वारे "मूळ कर प्रतीकाऐवजी नवीन कर-प्रतीक देईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे "व असा जादाकर भरण्यात येईपर्यंत अशारीतीने फेरफार केलेल्या किंवा उपयोग करण्याचे योजलेल्या अशा वाहनाच्या बाबतीत कराधान प्राधिकारी नवे कर-प्रतीक देणार नाही" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

कालमर्यादेत कर देण्यात न आल्यास द्यावयाचे व्याज.

[1][८ क. (१) कोणत्याही मोटार वाहनाच्या बाबतीत देणे असलेला कोणताही कर तो देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तरतूद केल्याप्रमाणे, वेळीच दिला नाही तर, अशी व्यक्ती, देय असलेल्या कराव्यतिरिक्त, ज्या कालावधीसाठी असा कर देणे असेल त्या कालावधीच्या पहिल्या दिवसापासून व्याज देण्यास पात्र ठरेल.

(२) [2][पोट-कलम (१) अन्वये देय असलेले व्याज, ज्या कालावधीसाठीचा कर देण्यात आला नसेल अशा प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी, न देण्यात आलेल्या कराच्या रकमेच्या २ टक्के या दराने परिगणित केले जाईल :

परंतु, या कलमान्वये देय असलेल्या व्याजाची रक्कम ही, न देण्यात आलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही;]

(३) पोट-कलम (१) अन्वये देय असलेल्या व्याजाच्या रक्कमेची परिगणना करताना, **पन्नास पैशांपेक्षा** कमी असलेला रुपयाचा भाग, [3][दुर्लक्षिण्यात येईल व रुपयाचा **पन्नास पैसे** किंवा त्याहून अधिक असलेला भाग हा] एक रुपया असा गणला जाईल.

(४) परिवहन आयुक्तास, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून व विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीच्या बाबतीत, या कलमान्वये देय असलेल्या संपूर्ण व्याजाची किंवा त्यातील कोणत्याही भागाची सूट देता येईल.]

कराचा परतावा.

**९.** [4][ (१) एखाद्या मोटार वाहनाच्या बाबतीत कोणत्याही कालावधीसाठी कोणताही कर आगाऊ भरला असेल आणि नोंदणीकृत मालकाने [5][अशा वाहनाच्या बाबतीत देण्यात आलेले कराधान प्रमाणपत्र कराधान प्राधिकाऱ्याच्या स्वाधीन केले असेल व त्याने ज्या कालावधीसाठी कर भरण्यात आला असेल त्या उर्वरित कालावधीतील संपूर्ण कालावधीत किंवा त्या कालावधीच्या भागात] प्रतिज्ञापनात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून राज्यातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तो, ते मोटार वाहन वापरात आणणार नाही किंवा वापरासाठी ठेवणार नाही असे प्रतिज्ञापन केले असेल तेव्हा, असा मालक, त्याबाबत अर्ज केल्यावर व विहित करण्यात येतील अशा (कोणत्याही असल्यास) शर्तींच्या अधीन राहून, [6][आणि कराधान प्राधिकाऱ्याने दिलेले त्या वाहनाचा वापर न केल्याबद्दलचे प्रमाणपत्र सादर केल्यावर] [7][तीस दिवसांच्या संपूर्ण

---

[1] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ६ द्वारे कलम '**८क**' समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५ (अ) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे "पन्नास पैसे व पन्नास पैशांपेक्षा अधिक असलेला भाग." या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४(१) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[5] सन १९७२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ९(१)(अ) द्वारे "अशा वाहनाच्या बाबतीत" या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि " उरलेल्या कालावधीत" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या क्रमांक ३७ याच्या कलम ९(१)(ब) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ७(अ) द्वारे "सुरू न झालेल्या प्रत्येक पूर्ण कॅलेंडर महिन्यासाठी" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कालावधीसाठी, — मग तो अशा एकाच कॅलेंडर महिन्यात येणारा असो किंवा नसो ] —अशा वाहनाच्या बाबतीत बसवलेल्या कराच्या वार्षिक दराच्या एक-बारांश रकमेइतक्या रकमेचा परतावा मिळण्यास हक्कदार असेल.] [१][ * * * * ]

(२) कोणत्याही व्यक्तीने एखाद्या मोटार वाहनाच्या बाबतीत कर आगाऊ भरला असेल तेव्हा, ती व्यक्ती [२][अशा वाहनाच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज नाकारण्यात आला आहे किंवा त्याची नोंदणी स्थगित किंवा रद्द करण्यात आली आहे असे नमूद केलेले नोंदणी प्राधिकाऱ्याचे सहीचे प्रमाणपत्र सादर केल्यावर, यथास्थिति, पूर्ण कराचा, किंवा पोट-कलम (१) मधील तरतुदींनुसार, ज्या कालावधीसाठी अशा वाहनाची नोंदणी स्थगित किंवा रद्द करण्यात आली असेल त्या कालावधीतील कराचा परतावा मिळण्यास हक्कदार असेल. ]

(३) ज्या मोटार वाहनाबाबत कर भरण्यात आला आहे अशा मोटार वाहनात, ते मोटार वाहन कमी दराने कर बसविण्यास पात्र होईल अशारीतीने त्यात फेरफार करण्यात आला असेल किंवा अशारीतीने त्याचा वापर करण्यात आला असेल तेव्हा, तो कर जिने भरला असेल ती व्यक्ती, [३][ * * * * ] [४][ * * * ] कराधान प्रमाणपत्र स्वाधीन केल्यानंतर, पोट-कलम (१) च्या तरतुदीअनुसार तिला जी रक्कम परत मिळाली असती ती रक्कम व अशा वाहनावर कमी दराने बसवण्याजोगी रक्कम यामधील फरकाइतक्या रकमेचा परतावा मिळण्यास हक्कदार असेल, आणि कराधान प्राधिकारी [५][ * * * ] कराधान प्रमाणपत्रात अशा परताव्याची नोंद करण्याची व्यवस्था करील.

(४) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,

(क) (एक) एखाद्या व्यक्तीस तिच्या आवाक्याबाहेरील कारणांमुळे [६][ * * * ] कराधान प्रमाणपत्र स्वाधीन करणे शक्य झाले नाही; आणि

(दोन) ज्या वाहनाबाबत कराच्या परताव्याची मागणी करण्यात आली असेल ते वाहन ज्या कालावधीसाठी अशा परताव्याची मागणी करण्यात आली असेल त्या कालावधीत कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वापरण्यात येणार नाही; [७][ * * * ]

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३ द्वारे "परतावा एका वेळी तीन महिन्यापेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी, त्या प्रयोजनार्थ योग्य पडताळणी केल्यानंतर देण्यात येईल. " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४(२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४(३) द्वारे "वाहनात अशा तऱ्हेचा फेरफार करण्यात आला आहे किंवा त्याचा उपयोग करण्यात आला आहे अशा मजकुराचे कर प्राधिकाऱ्याच्या सहीचे प्रमाणपत्र हजर केल्यावर" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ९(२) (अ) द्वारे "कर-प्रतीक व " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९(२) (ब) द्वारे "वाहनाच्या नोंदणीकृत मालकास किंवा जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली ते वाहन असेल त्या व्यक्तीस मूळच्या कर-प्रतीकाऐवजी नवीन कर-प्रतीक देईल आणि" हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ९(३) (अ) द्वारे "कर-प्रतीक किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७(अ) (एक) द्वारे "किंवा" हा शब्द वगळण्यात आला.

(ख) (एक) ज्या वाहनाबाबत कराच्या परताव्याची मागणी केली असेल ते वाहन ज्या कालावधीसाठी अशा परताव्याची मागणी करण्यात आली असेल त्या कालावधीत कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी वापरण्यात आले नाही; आणि

(दोन) परताव्याची मागणी करण्यासंबंधीचा अर्ज, तिच्या आवाक्याबाहेरील कारणांमुळे करता आला नाही. परंतु, विहित करण्यात येईल अशा कालावधीत असा अर्ज करण्यात आला आहे; [१][ * * * ]

[२][याविषयी कराधान प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर,] ती व्यक्ती त्या पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे कराचा परतावा मिळण्यास हक्कदार असेल;

[३][(४क) मोटार वाहनाच्या नोंदणीकृत मालकाने किंवा ते वाहन कब्जात किंवा नियंत्रण असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने तिच्याकडून देणे असलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक कर दिला असेल त्याबाबतीत, कराधान प्राधिकारी अशा नोंदणीकृत मालकाकडून किंवा व्यक्तीकडून अशा वाहनाच्या बाबतीत, कोणत्याही कालावधीसाठी कराची कोणतीही थकबाकी देय नाही याबद्दल खात्री करून घेतल्यानंतर, अशा नोंदणीकृत मालकास किंवा व्यक्तीस अशी अधिक रक्कम परत करील :

परंतु, जर असा नोंदणीकृत मालक किंवा अशी व्यक्ती कराधान प्राधिकाऱ्यास लेखी सूचना पाठवून आपणास परतावा योग्य रकमेचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे विनियोजन अशा सूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही भावी कालावधीच्या कराचा भरणा करण्यासाठी करण्यात यावे असे नमूद करील व अशारीतीने कर भरणा केल्याची नोंद करण्यासाठी असे कराधान प्रमाणपत्र सादर करील तर, कराधान प्राधिकारी, त्या प्रयोजनासाठी योग्य ती पडताळणी केल्यानंतर, कराधान प्रमाणपत्र आपल्या सहीने नोंद करण्याची व्यवस्था करील व परतावा योग्य रकमेचे, किंवा यथास्थिति तिच्या, भागाचे, ज्या भावी कालावधीबाबत कराच्या रकमेचे विनियोजन करण्यात येईल तो कालावधी त्यामध्ये विनिर्दिष्ट करील आणि असे विनियोजन करण्यात आल्यानंतर, शिल्लक रक्कम कोणतीही असल्यास, ती रक्कम अशा मालकास किंवा व्यक्तीस परत करील.]

[४][(५) या कलमान्वये कोणत्याही वाहनाच्या बाबतीत कोणताही परतावा देण्यात आला असेल तेव्हा, कराधान प्राधिकारी कराधान प्रमाणपत्रात अशा परताव्याची, आणि तसेच कमी दराची आणि ज्या दिनांकापासून असा कमी दर बसविण्यात आला असेल त्या दिनांकाची नोंद करण्याची व्यवस्था करील.]

[५][(६) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे कलम ३ च्या पोट-कलम (**१ग**), (**१घ**) किंवा (**१ङ**) अन्वये कर भरण्यात आलेला असेल तेथे, नोंदणीकृत मालक,—

---

१ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७(अ) (दोन) (तीन) आणि (चार) द्वारे "किंवा" हा शब्द, तसेच खंड (ग) आणि त्याखालील दोन परंतुके वगळण्यात आली.

२ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४(४)(अ) द्वारे "या विषयी कर प्राधिकाऱ्याची खात्री झाली आहे अशा मजकुराचे कर प्राधिकाऱ्याच्या सहीचे प्रमाणपत्र हजर केल्यावर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ७(ब) द्वारे पोट-कलम (४क) समाविष्ट करण्यात आले.

४ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ४(५) द्वारे पोट-कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

५ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ७(ब) द्वारे पोट-कलम (६) समाविष्ट करण्यात आले.

(क) मालकीच्या हस्तांतरणामुळे किंवा पत्त्यातील बदलामुळे, मोटार वाहन कोणत्याही इतर राज्यात हलविणे; किंवा

(ख) अपघातामुळे किंवा अन्य कोणताही कारणामुळे मोडीत काढलेल्या मोटार वाहनाची नोंदणी स्थगित करणे किंवा रद्द करणे;

अशा बाबतीत, दुसऱ्या अनुसूचीत किंवा यथास्थिति, तिसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या दराने कराचा परतावा मिळण्यास हक्कदार असेल :

परंतु, कराधान प्राधिकारी,—

(एक) मालकीच्या हस्तांतरणामुळे किंवा पत्ता बदलल्यामुळे मोटार वाहन महाराष्ट्र राज्याच्या बाहेर हस्तांतरित केले असेल अशा प्रकरणामध्ये, महाराष्ट्र राज्याबाहेर ते हस्तांतरित केल्याचा पुरेसा पुरावा सादर केल्यावरच, आणि

(दोन) मोटार वाहन मोडीत काढल्याच्या प्रकरणामध्ये, त्याची दुरुस्ती होणे शक्य नाही व ते पुन्हा वापरता येणार नाही असे विमा कंपनीचे प्रमाणपत्र किंवा अन्य कोणताही पुरेसा कागदोपत्री पुरावा दाखल केल्यावरच,

कराचा परतावा, देईल.]

[१][(६क) पोट-कलम (१) आणि (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याच्या संबंधात कलम ३ चे [२][पोट-कलम (१ग), (१घ) किंवा यथास्थिति (१ङ)] अन्वये कर भरण्यात आलेला आहे असे [३][मोटार वाहन] हे, जे कमी दराने कर बसविण्यायोग्य आहे असे [३][मोटारवाहन] ठरेल अशा रीतीने त्याच्यात फेरफार करण्यात येईल किंवा ते वापरण्यात येईल तेव्हा, असा कर भरलेली व्यक्ती, कर प्रमाणपत्र स्वाधीन केल्यावर, अशा [३][मोटार वाहनाच्या] वापरात ते कमी दराच्या करास पात्र ठरेल अशा प्रकारचा बदल केला नसता तर, अशा वापराच्या दिनांकास त्याच्यावर एकाच वेळी द्यावयाच्या कराची जेवढी रक्कम बसविण्यायोग्य झाली असती ती रक्कम आणि वापरात असा बदल केल्याच्या दिनांकास अशा [३][मोटार वाहनावर] कमी दराने बसविण्यायोग्य असलेली कराची रक्कम यातील फरकाच्या रकमेइतका परतावा मिळण्यास हक्कदार असेल; आणि कराधान प्राधिकारी अशा परताव्याची नोंद कराधान प्रमाणपत्रात करण्याची व्यवस्था करील.]

[४][(७) पोट-कलम (६) च्या तरतुदींना बाध न येऊ देता, पोट-कलमे (१), (२), (४), (४क) आणि (५) यांच्या तरतुदी, कलम ३ च्या पोट-कलम (१ग), (१घ) किंवा, यथास्थिति (१ङ) खाली देण्यात आलेल्या कराचा, मोटार वाहन तात्पुरत्या काळासाठी वापरात नसेल त्याबाबतीत परतावा देण्याच्या संबंधात पुढील फेरबदलांसह लागू होतील :—

---

१ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ९(२) द्वारे पोट-कलम (६क) समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ७(क) (दोन) द्वारे "पोट-कलम (१क) किंवा यथास्थिती, कलम ३ चे पोट-कलम (१ड)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७(क) (एक) द्वारे "मोटार सायकल, तिचाकी किंवा मोटारगाडी किंवा ओम्नीबस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७(ड) द्वारे पोट-कलम (७) दाखल करण्यात आले.

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) "कोणत्याही कालावधीसाठी कोणताही कर आगाऊ" या मजकुराऐवजी "कलम ३ च्या पोट-कलम (१ग), (१घ) किंवा यथास्थिति, पोट-कलम (१ङ) अन्वये कोणताही कर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) "सुरू न झालेल्या" या मजकुराने प्रारंभ होणाऱ्या "रकमेइतक्या रकमेचा" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"प्रत्येक पूर्ण तिमाहीसाठी दुसऱ्या अनुसूचीमध्ये किंवा यथास्थिति, तिसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी आकारलेल्या कराचा";

(तीन) पुढील स्पष्टीकरण व परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी, "तिमाही" याचा अर्थ, मालकाने, कराधान प्राधिकाऱ्याला, मोटार वाहन वापरात नसल्याबाबतची माहिती ज्या महिन्यात कळविली असेल त्या महिन्याच्या पाठोपाठच्या महिन्याच्या पहिल्या दिनांकापासून सुरू होणारा तीन कॅलेंडर महिन्यांचा कालावधी, असा आहे :

परंतु, एखादी व्यक्ती, एखाद्या मोटार वाहनाच्या संबंधात,—

(एक) एकाच कालावधीसाठी, एकतर या पोट-कलमाखाली किंवा यथास्थिति, पोट-कलम (६) खाली परंतु, या दोन्ही पोट-कलमांखाली नव्हे;

(दोन) वेळोवेळी मागणी केलेल्या व मिळालेल्या अशा कराच्या परताव्याची एकूण रक्कम, अशा मोटार वाहनाच्या बाबतीत दिलेल्या एकाच वेळी द्यावयाच्या कराच्या रकमेपेक्षा अधिक नसेल तर,

त्या मोटार वाहनाचा वापर न केल्याबद्दल कराचा परतावा मिळण्यास हक्कदार असेल; "

(ख) पोट-कलम (२) मध्ये, "कर आगाऊ" या मजकुराऐवजी "एकाच वेळी द्यावयाचा कर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ग) पोट-कलम (४क) मधील परंतुक वगळण्यात येईल;

(घ) पोट-कलम (५) मधील, " आणि तसेच कमी दराची आणि ज्या दिनांकापासून असा कमी दर बसविण्यात आला असेल त्या दिनांकाची " हा मजकूर वगळण्यात येईल.]

[१][ * * * ]

ताफ्याच्या मालकांसाठी विशेष तरतूद.

[२][**१०.** ताफ्याच्या मालकाच्या बाबतीत, कलमे ३, ४, ५, ६ आणि ९ यांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, पुढील फेरबदलांच्या अधीन राहून, लागू होतील :—

---

१ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १९(ङ) द्वारे पोट-कलम (८) वगळण्यात आले.

२ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १० द्वारे कलम १० दाखल करण्यात आले.

(१) ३१ मार्च, १९७३ रोजी संपणाऱ्या वर्षासंबंधात किंवा त्यानंतरच्या कोणत्याही वर्षासाठी ताफ्याच्या मालकाने द्यावयाच्या कराची रक्कम निश्चित करण्यासाठी ताफ्याचा मालक, असे कोणतेही वर्ष समाप्त झाल्यानंतर, एका महिन्याच्या आत त्या वर्षात त्याने राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या सर्व वाहतूक वाहनांसंबंधी, विहित नमुन्यात, विहित तपशील नमूद करणारे, एक प्रतिज्ञापन करील, आणि ते कराधान प्राधिकाऱ्याकडे सुपूर्द करील. अशा प्रतिज्ञापनासोबत, मुंबई मोटार
१९७२ चा महा. ३७. वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी लागू असलेल्या कलम १० अन्वये, किंवा यथास्थिति, पोट-कलम (२) अन्वये ताफ्याच्या मालकास कराच्या रकमेचा भरणा केल्यासंबंधीचे दिलेले तात्पुरते प्रमाणपत्र आणि विहित करण्यात येतील अशी इतर कागदपत्रे जोडील.

(२) ताफ्याचा मालक, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या आणि सुपूर्द केलेल्या अशा प्रतिज्ञापनाच्या आधारावर, ज्या वर्षाशी त प्रतिज्ञापन संबंधित असेल त्या वर्षानंतरच्या वर्षासाठी कराचा तात्पुरता भरणा म्हणून अशा प्रतिज्ञापनानुसार देय असलेल्या कराच्या रकमेइतकी रक्कम देईल.

(३) असे प्रतिज्ञापन मिळाल्यावर, कराधान प्राधिकारी, ज्या वर्षासाठी कर देय असेल त्या वर्षात ताफ्याचा मालक वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या वाहतक् वाहनांची संख्या, टप्पा वाहने आणि कंत्राटी वाहने यांच्या बाबतीतील अनुज्ञापित वहन क्षमता, माल वाहनांच्या बाबतीतील नोंद केलेले ओझ्यासहित वजन, इतर वाहतक् वाहनांच्या बाबतीत त्या वाहनांचे ओझेविरहित वजन आणि आवश्यक असेल असा इतर तपशील यांची पडताळणी करील आणि अशा ताफ्याच्या मालकाच्या वाहतक् वाहनांवर कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या दरांनी बसविण्याजोग्या कराची रक्कम अंतिमरित्या निर्धारित करील आणि विहित करण्यात येईल अशा कालावधीच्या आत आणि अशा नमुन्यात त्या वर्षासाठी कराच्या अंतिम आकारणीचे प्रमाणपत्र देऊन ताफ्याच्या मालकास तसे कळवील :

परंतु, ताफ्याच्या मालकाच्या मोटार वाहनाची वहन क्षमता किंवा नोंद केलेले ओझ्यासहित वजन वर्षात कोणत्याही वेळी कमी होईल त्या बाबतीत, अशा वाहनासंबंधात वसूल केलेला कर, कमी होण्यापूर्वी अशा मोटार वाहनाची वहन क्षमता किंवा नोंद केलेले ओझ्यासहित वजन यासाठी कराच्या वार्षिक दराच्या आधारावर बसविण्याजोग्या कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(४) ताफ्याच्या मालकाने अगोदरच केलेला कराचा तात्पुरता भरणा लक्षात घेऊन, पोट-कलम (३) अन्वये कराची रक्कम अंतिमरीत्या निर्धारित केली असेल त्या बाबतीत, देणे असेल अशी फरकाची रक्कम (कोणतीही असल्यास) विहित करण्यात येईल अशारीतीने आणि अशा वेळेच्या आत ताफ्याच्या मालकाकडून घेण्यात येईल किंवा त्याला परत करण्यात येईल :

[१][परंतु, जी वाहने एक किंवा अधिक कॅलेंडर महिन्याच्या कालावधीसाठी वापरण्यात आली नाहीत असे कराधान प्राधिकाऱ्याने प्रमाणित केले असेल अशा वाहनांच्या संबंधात, अंतिमरीत्या बसविण्यायोग्य कराच्या रकमेमध्ये प्रमाणशीर घट होण्यासाठी ताफ्याचा मालक हक्कदार असेल.]

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(५) आपल्या वाहतूक वाहनांपैकी कोणत्याही वाहतूक वाहनाच्या मालकीहक्काचे हस्तांतरण केल्यापासून तीस दिवसांच्या आत, ताफ्याचा मालक, हस्तांतरणाबाबत कराधान प्राधिकाऱ्यास कळवील.

(६) कराधान प्राधिकाऱ्यास, या कलमाच्या प्रयोजनांसाठी, आपल्यापुढे कोणतीही वाहतूक वाहने हजर करण्यास किंवा कोणतेही लेखे, नोंदवह्या, अभिलेख किंवा इतर कागदपत्रे सादर करण्यास किंवा कोणतीही माहिती देण्यास ताफ्याच्या मालकास फर्मावता येईल किंवा ती वाहने किंवा लेखे, नोंदवह्या, अभिलेख किंवा इतर कागदपत्रे तपासता येतील आणि ताफ्याचा मालक त्याच्याकडे केलेली अशी कोणतीही मागणी पूर्ण करील.

(७) मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभास किंवा त्यानंतर जी ताफ्याचा मालक बनली असेल ती व्यक्ती, ताफ्याचा मालक बनल्यापासून तीस दिवसांच्या आत, पोट-कलम (१) खाली प्रतिज्ञापन करील आणि ते कराधान प्राधिकाऱ्याच्या सुपूर्द करील आणि अशा प्रतिज्ञापनानुसार जो कर भरण्यास ती पात्र असल्याचे दिसून येईल अशा कराचा पोट-कलम (२) अन्वये तात्पुरता भरणाही करील.] १९७२ चा महा. ३७.

तात्पुरते परवाने घेऊन राज्यात आणलेल्या वाहतूक वाहनांवरील कर.

[1][**१०क.** (१) *मोटार वाहन अधिनियम, १९३९ खाली दिलेल्या तात्पुरत्या परवान्याच्या आधारावर एखादे मोटार वाहन राज्यात वापरासाठी आणले असेल किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेले असेल त्या बाबतीत, ज्या कालावधीसाठी ते राज्यात वापरले असेल किंवा वापरासाठी ठेवले असेल त्या संपूर्ण कालावधीसाठी त्यावर [2][कलम ४ मध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे] कर बसविण्यात येईल आणि तो वसूल करण्यात येईल : १९३९ चा ४.

[3][परंतु, वाहतूक वाहन ज्या कालावधीसाठी राज्यात वापरात आणले असेल किंवा वापरासाठी ठेवले असेल तो कालावधी, सात दिवसांपेक्षा अधिक होत नसेल तर, बसवावयाचा आणि वसूल करावयाचा कर हा, एका महिन्यासाठी देय असलेल्या कराच्या एक-तृतीयांश इतका असेल.]

(२) वाहनाच्या मालकाकडून किंवा जिच्या कब्जात व नियंत्रणात वाहन असेल अशा व्यक्तीकडून राज्यात ज्याच्या अधिकारिताक्षेत्रात ते वाहन वापरात आणले असेल किंवा वापरासाठी ठेवले असेल त्या कराधान प्राधिकाऱ्याला, ते वाहन राज्यात आल्यापासून सात दिवसांच्या आत किंवा कराधान प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्याकडून या बाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने मागणी केल्यावर, यांपैकी जी गोष्ट आधी घडेल त्यानुसार, कराची रक्कम देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता,--

(क) राज्यात ज्या कालावधीसाठी वाहन वापरात आणले असेल किंवा वापरासाठी ठेवले असेल तो कालावधी मोजताना, कॅलेंडर महिन्याचा एखादा भाग हा एक महिना असल्याचे मानण्यात येईल; आणि

(ख) ज्या कालावधीसाठी कर भरावयाचा असेल तो कालावधी तिमाही अखेरीस संपलाच पाहिजे अशी आवश्यकता नाही.]

---

[1] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ११ द्वारे कलम १०**क** समाविष्ट करण्यात आले.

* आता पहा :-मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९)

[2] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ८(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

करा‍च्या उत्पन्नाची रक्कम कोठे जमा करावयाची व तिचा उपयोग.

**११.** (१) [1][ * * * ]

(२) राज्य शासनाने [2][वसूल केलेल्या कराच्या उत्पन्नातून] --

(क) प्रत्येक स्थानिक प्राधिकरणास, त्यास या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९३५, किंवा यथास्थिति, मध्यप्रांत व वऱ्हाड मोटार वाहन कर आकारणी अधिनियम, १९४७ यांच्या तरतुदींन्वये जी रक्कम देण्यात येत होती त्या रकमेइतकी रक्कम दरवर्षी देणे चालू ठेवण्यात येईल. १९३५ चा मुंबई ३४. १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम, ६.

(ख) जे कोणतेही स्थानिक मंडळ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी वाहनांवर किंवा प्राण्यांवर किंवा मनुष्यांवर पथकर बसवत होते त्या प्रत्येक स्थानिक मंडळास आणि जे कोणतेही इतर स्थानिक प्राधिकरण अशा प्रारंभाच्या वेळी मोटार वाहनांवर व अनुयानांवर पथकर बसवत होते किंवा वसूल करत होते अशा स्थानिक प्राधिकरणास, राज्य शासनाने संबंधित स्थानिक मंडळ किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून निर्धारित केलेली अशी रक्कम दरवर्षी देण्यात येईल. ही रक्कम, ३१ मार्च, १९५८ रोजी संपणाऱ्या तीन वर्षातील वसुलीचा खर्च वजा जाता अशा स्थानिक मंडळाचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे अशा पथकरापासून मिळणारे निव्वळ सरासरी वार्षिक उत्पन्न दर्शवणारी रक्कम, अधिक अशा रकमेच्या १० टक्के इतकी असेल.

:७२ चा महा. ३.

:३९ चा ४.

(ग) [3][ चौथ्या अनुसूचीमध्ये] विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक प्राधिकरणांपैकी प्रत्येक स्थानिक प्राधिकरणास दरवर्षी, अंशदान म्हणून, त्या अनुसूचीत त्यांच्यासमोर उल्लेख केलेली रक्कम देण्यात येईल.

[4][ (घ) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर ज्या स्थानिक प्राधिकरणाने कलम २०, पोट-कलम (२) च्या परंतुकाच्या खंड (क) च्या तरतुदींच्या आधारे मोटार वाहनावर कर बसविणे व वसूल करणे चालू ठेवले असेल आणि त्यानंतर केव्हा तरी असा कर बसविण्याचे व वसूल करण्याचे बंद केले असेल त्या स्थानिक प्राधिकरणास त्याने तसे करण्याचे बंद केल्याच्या दिनांकापासून राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशी रक्कम मार्ग अनुदान म्हणून दरवर्षी देण्यात येईल :]

[5][परंतु, या पोट-कलमान्वये अंशदानाची जी रक्कम दिनांक १ मे, १९६२ च्या निकटपूर्वी विद्यमान स्थानिक मंडळास देण्यात आली होती, ती रक्कम त्या दिनांकानंतर उत्तराधिकारी **जिल्हा परिषदेस** देण्यात येईल.]

(३) पोट-कलम (२) अन्वये स्थानिक प्राधिकरणास द्यावयाचे अंशदान राज्य शासन संबंधित स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, विहित करील अशा हप्त्यांनी व अशा रीतीने व अशा दिनांकांना देण्यात येईल.

[6][ * * * ]

---

[1] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ द्वारे पोट-कलम वगळण्यात आले.

[2] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ६(ब) (एक) द्वारे "राज्य मार्ग निधीतून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ८(ब) द्वारे "सातवी अनुसूची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४(ब) द्वारे खंड (घ) समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ६(ब) (दोन) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[6] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २(क) आणि (ख) द्वारे पोट-कलमे (४), (५) आणि स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[१][कराची व व्याजाची] थकबाकी जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

**१२.** या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तरतूद केल्याप्रमाणे देणे असलेला व न भरलेला [१][कोणताही कर किंवा व्याज] या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीन राहून, जमीन महसुलाची थकबाकी ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने वसूल करता येईल :

[२][परंतु जर व्याजासह कराच्या थकबाकीची रक्कम दहा हजार रुपयांपेक्षा अधिक होत असेल तर, राज्य शासनाने याबाबतीत पदनिर्देशित केलेला अधिकारी, आदेशाद्वारे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, हे प्रदान चारपेक्षा अधिक नसणाऱ्या हप्त्यांमध्ये एका वर्षाच्या कालावधीत करण्याची सुविधा देऊ शकेल.]

विवक्षित बाबतीत मोटार वाहनांच्या वापरावर निर्बंध.

[४][**१२ क.** राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या कोणत्याही मोटार वाहनाबाबत देय असलेला कोणताही कर या अधिनियमाच्या तरतुदींन्वये तो देय झाल्यानंतर तीस दिवसांपेक्षा अधिक दिवसांपर्यंत भरावयाचा राहिला असेल तर, [५][कर आणि देणे असलेले कोणतेही व्याज भरण्यात येईपर्यंत ] असे कोणतेही वाहन राज्यातील कोणत्याही रस्त्यावर वापरता येणार नाही.

कर भरला नसेल तर मोटार वाहन जप्त करण्याचा व अटकावून ठेवण्याचा अधिकार.

**१२ ख.** कलमे १२, १२**क** व १६ मधील तरतुदींना बाध न आणता, कोणत्याही वाहनाच्या बाबतीत देणे असलेला कोणताही कर कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे भरण्यात आला नसेल तेव्हा, राज्य शासन याबाबत अधिकार देईल, त्याप्रमाणे मोटार वाहन विभागातील मोटार वाहन निरीक्षकाच्या किंवा पोलीस विभागातील पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याला, याबाबत केलेल्या नियमांच्या अधीन राहून, ज्या मोटार वाहनाच्या बाबतीत या अधिनियमाअन्वये कर देणे असेल तर ते वाहन जप्त करता येईल व अटकावून ठेवता येईल आणि या प्रयोजनासाठी त्या वाहनाच्या बाबतीत [६][देय असलेला कर आणि व्याज, कोणतेही असल्यास ] भरण्यात येईपर्यंत त्या वाहनाच्या योग्य परिरक्षणासाठी व सुरक्षित अभिरक्षेसाठी सर्व उपाययोजना करता येतील किंवा तसे करण्याची व्यवस्था करता येईल आणि वाहनाच्या परिरक्षणासाठी व अभिरक्षेसाठी काही खर्च झाला असल्यास, तो वसूल करण्यासाठी तरतूद करता येईल.]

---

१ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १०(अ) द्वारे "कोणताही कर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ९ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १०(ब) द्वारे "कर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ७ द्वारे कलमे १२**क** आणि १२**ख** समाविष्ट करण्यात आलीत.

५ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ११ द्वारे "कर भरण्यात येईपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियाच्या कलम १२ द्वारे "देय असलेला कर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सूट. **१३.** (१) शेतांवर किंवा शेतजमिनींवर केवळ शेतीचे काम करण्यासाठी बनविलेल्या किंवा वापरात असलेल्या [१][मोटार वाहनांनी ओढल्या जाणाऱ्या अनुयानांखेरीज इतर] सर्व मोटार वाहनांना असा कर भरण्यातून सूट असेल.

(२) राज्य शासनाला, [२][ * * * ] **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पोट-कलम (१) खाली येणाऱ्या मोटार वाहनांखेरीज कोणत्याही प्रकारच्या वाहनांना किंवा कोणत्याही वर्गाच्या व्यक्तींच्या मालकीच्या कोणत्याही मोटार वाहनांना [३][किंवा केवळ कोणत्याही धर्मादाय प्रयोजनासाठी किंवा त्याच्या अभिवृद्ध्यर्थ वापरलेल्या कोणत्याही मोटार वाहनास] [४][किंवा आग, पूर, भूकंप, अवर्षण किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये लोकांना सहाय्य देण्यासाठी वापरलेल्या कोणत्याही मोटार वाहनास] [५][अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती, कोणत्याही असल्यास, त्यांस अधीन राहून,] कर भरण्यातून पूर्णतः किंवा अंशतः सूट देता येईल :

[६][परंतु, अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये लोकांना सहाय्य देण्यासाठी मोटार वाहनांचा वापर करण्यात आला असेल त्याबाबतीत, राज्य शासनाला, अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये लोकांना सहाय्य देण्यासाठी ज्या कालावधीत किंवा कालावधीमध्ये असे वाहन वापरण्यात आले होते, अशा कोणत्याही कालावधीसाठी त्या वाहनास कर भरण्यातून भूतलक्षी प्रभावाने सूट देता येईल.]

[७][(३) या कलमाखाली कर भरण्याबाबत सूट मागणारी कोणतीही व्यक्ती, ज्या मोटार वाहनाच्या बाबतीत अशी सूट मागितली असेल ते मोटार वाहन ज्याच्या अधिकारिता क्षेत्रात वापरात असेल किंवा वापरासाठी ठेवले असेल त्या कराधान प्राधिकाऱ्याकडे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने व अशा वेळेत अर्ज करील.]

[१] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १२(१) (अ) द्वारे "त्याबाबत केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधास अधीन राहून" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ८(१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १३(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १२(१) (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १३(ब) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १२(२) द्वारे पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

**स्पष्टीकरण.**—[1][१] या कलमाच्या प्रयोजनाकरिता "शेतीचे काम" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जमिनीची मशागत, पेरणी, कापणी, शेतीच्या मालाची मळणी किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी करण्यात येणारे कोणतेही इतर तत्सम काम, असा आहे, [2][आणि त्यात वाहनाच्या मालकाच्या राहण्याच्या ठिकाणापासून किंवा मोटारघरापासून किंवा दुरुस्तीच्या ठिकाणापासून त्याच्या शेतापर्यंत आणि शेतापासून पूर्वोक्त ठिकाणांपैकी कोणत्याही ठिकाणापर्यंत वाहनाचा वापर करणे याचा [3][आणि खरेदीच्या ठिकाणापासून नोंदणी करणाऱ्या कार्यालयापर्यंत आणि मालकाच्या राहण्याच्या ठिकाणापर्यंत, मोटारघरापर्यंत, दुरुस्तीच्या ठिकाणापर्यंत किंवा यथास्थिति, शेतापर्यंत वाहनाचा वापर करणे याचाही, समावेश होतो;] परंतु, त्यात शेतीच्या प्रयोजनासाठी व्यक्तींची किंवा सामानाची वाहतूक करणे किंवा शेतीच्या मालाची वाहतूक करणे याचा समावेश होत नाही.

[4][**स्पष्टीकरण.**— २ या कलमाच्या प्रयोजनांसाठी, धर्मादाय प्रयोजनात खालील बाबींचा समावेश होतो :—

(१) दारिद्र्य निवारण किंवा दु:ख निवारण,

(२) वैद्यकीय सहाय्य,

(३) शिक्षण,

(४) धार्मिक शिकवण किंवा उपासना,

(५) सर्वसाधारण सार्वजनिक उपयुक्ततेच्या अन्य उद्दिष्टांची अभिवृद्धी.]

अपील.

**१४.** (१) कराधान प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा व्यक्तीकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे, अशारीतीने, अशा वेळेच्या आत व अशी फी दिल्यावर, अपील करता येईल.

(२) अशा अपिलाची सुनावणी व निर्णय विहित करण्यात येईल अशारीतीने केला जाईल.

पुनरीक्षण

[5][**१४ क.** (१) राज्य शासनाला, किंवा [6][* * * ] [7][परिवहन आयुक्ताला] किंवा याबाबत

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ८(२) द्वारे मूळ स्पष्टीकरणास स्पष्टीकरण १ असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ८(२)(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[4] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ८(२) (ब) द्वारे स्पष्टीकरण २ जादा दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे "कलम **१४क**" समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १४ द्वारे "परिवहन संचालक म्हणून राज्य सरकारने नियुक्त केलेल्या" हा मजकूर वगळण्यात आला.

[7] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १३(१) द्वारे "परिवहन संचालकाला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याचे कलम १३(२) पुढीलप्रमाणे आहे :-

" (२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीतील किंवा कोणत्याही लेखातील किंवा दस्तऐवजातील कोणत्याही स्वरूपाच्या मजकुरातील परिवहन संचालकांसंबंधीचा निर्देश हा, मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभानंतर, परिवहन आयुक्तांसंबंधीचा निर्देश असल्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल; आणि अशा प्रारंभाच्या दिनांकास कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे प्रलंबित असलेल्या ज्या दाव्यात आणि वैध कार्यवाहीत परिवहन संचालक हा, एक पक्षकार असेल अशा सर्व दाव्यात आणि वैध कार्यवाहीत परिवहन आयुक्त हा पक्षकार असल्याचे मानण्यात येईल."

१९७२ चा महा. ३७.

शासनाने पदनिर्देशित केलेल्या, शासनाच्या उपसचिवाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याला स्वतः होऊन किंवा अर्ज करण्यात आल्यावर या अधिनियमान्वये कोणत्याही कराधान प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचा अभिलेख मागवता येईल व त्याची तपासणी करता येईल आणि त्यावर त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल:

परंतु असे की, या कलमान्वये केलेला कोणताही अर्ज, आदेशाच्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या कालावधीच्या आत करण्यात आला नसेल तर, तो विचारार्थी स्वीकारण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा कोणत्याही आदेशांच्या फेरतपासणीसाठी केलेला कोणताही आदेश फेटाळण्यापूर्वी यथास्थिति, राज्य शासन, [१][परिवहन आयुक्त] किंवा पदनिर्देशित अधिकारी अशा आदेश फेटाळण्यासंबंधीची कारणे नमूद करील.

(२) या कलमान्वये दिलेल्या ज्या आदेशामुळे कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल तर, यथास्थिति, राज्य शासनाने [१][परिवहन आयुक्ताने] किंवा पदनिर्देशित अधिकाऱ्याने अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(३) कलम १४ अन्वये कोणत्याही व्यक्तीस अपील करता आले असते परंतु तिने कोणतेही अपील केले नसेल तेव्हा, अशा व्यक्तीने अर्ज केल्यावर या कलमान्वये फेरतपासणीची कोणतीही कार्यवाही ही विचारार्थ घेतली जाणार नाही.]

**पोलीस अधिकाऱ्याचा व मोटार वाहन विभाग अधिकाऱ्यांचा अधिकार.**

**१५.** याबाबत राज्य शासन विहित करील अशा दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा गणवेषधारी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा मोटार वाहन विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास,—

(क) ज्या कोणत्याही जागेत मोटार वाहन ठेवले आहे असे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत सूर्योदय ते सूर्यास्त यादरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल, किंवा

(ख) कोणत्याही सार्वजनिक जागेत कोणत्याही मोटार वाहन चालकास असे वाहन थांबविण्याविषयी व अशा वाहनाबाबत या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार द्यावयाची कराची रक्कम भरण्यात आली आहे याबद्दल आपली खात्री करून घेण्यासाठी वाजवी रीतीने आवश्यक असेल तोपर्यंत ते वाहन उभे करून ठेवण्याविषयी फर्मविता येईल.

---

१ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १३(१) द्वारे "परिवहन संचालकाला" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सन १९८५ चा मुंबई अधिनियम ६५ याच्या कलम १४ क ची सुधारणा.

१९७२ चा महा. ३७.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १३(२) पुढीलप्रमाणे आहे :- "(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीतील किंवा कोणत्याही लेखातील किंवा दस्तऐवजातील कोणत्याही स्वरूपाच्या मजकुरातील परिवहन संचालकांसंबंधीचा निर्देश हा, मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभानंतर, परिवहन आयुक्तांसंबंधीचा निर्देश असल्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल; आणि अशा प्रारंभाच्या दिनांकास कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे प्रलंबित असलेल्या ज्या दाव्यात आणि कायदेशीर कार्यवाहीत परिवहन संचालक हा एक पक्षकार असेल, अशा सर्व दाव्यात आणि वैध कार्यवाहीत परिवहन आयुक्त हा पक्षकार असल्याचे मानण्यात येईल."

चा
१७.

१६. (१) जी कोणतीही व्यक्ती,—

[७][कर व व्याज] न भरता मोटार वाहन कब्जात किंवा नियंत्रणाखाली ठेवणे, अपुरे व खोटे प्रतिज्ञापन करणे वगैरेबद्दल शास्ती.

(क) राज्यात वापरात येत असलेल्या किंवा वापरासाठी ठेवलेल्या मोटार वाहनाबाबत या अधिनियमाच्या तरतुदी अनुसार देणे असलेला कर [१][किंवा व्याज] न भरता नोंदणीकृत मालक म्हणून किंवा अन्यथा [२][खंड (कक) मध्ये करण्यात आलेली तरतूद वगळून] असे वाहन आपल्या कब्जात किंवा नियंत्रणात ठेवील, किंवा

[३][(कक) कोणत्याही इतर राज्यात नोंदणी झालेले वाहतूक वाहन, प्रवेशाच्या ठिकाणाच्या सर्वात जवळ असलेल्या कर वसुली केंद्रामध्ये भरावयाच्या कराचा किंवा व्याजाचा भरणा केल्याशिवाय या राज्यामध्ये आणील किंवा आणण्याची व्यवस्था करील, किंवा]

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रतिज्ञापनात जो तपशील नमूद करणे आवश्यक असेल तो तपशील पूर्णपणे किंवा खरेपणाने नमूद न करता असे प्रतिज्ञापन किंवा अतिरिक्त प्रतिज्ञापन सुपूर्द करील, किंवा

(ग) कलम १५, च्या खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत असताना कोणत्याही अधिकाऱ्यास अडथळा करील किंवा त्या कलमातील खंड (ख) अन्वये अशा अधिकाऱ्याने मोटार वाहन थांबविण्यास सांगितले असता तसे करण्यात कसूर करील,

त्या व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्यात आले असता—

(एक) [४][अशा वाहनाबाबत दोन तिमाहींकरिता देय असलेल्या कराइतक्या] रकमेपेक्षा कमी नसेल अशा रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा द्रव्यदंड अशा वाहनाच्या बाबतीत देय असलेल्या वार्षिक कराइतक्या रकमेपर्यंत असू शकेल; [५] * * *

(दोन) अशा व्यक्तीस या कलमाखाली अपराधाबद्दल पूर्वी दोषी ठरविण्यात आले असेल त्या बाबतीत, [६][अशा वाहनाच्या बाबतीत देय असलेल्या वार्षिक कराइतक्या] रकमेपेक्षा कमी नसेल इतक्या

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १५(अ) (एक) द्वारे "किंवा जादा कर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०(अ)(एक) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १०(अ) (दोन) द्वारे "खंड (कक)" समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १५(अ) (दोन) द्वारे "अशा वाहनाबाबत देय असलेल्या तिमाही कराइतक्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ८(अ)द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

[६] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १५(अ) (तीन) द्वारे "अशा वाहनाच्या बाबतीत दोन तिमाहींबद्दल देय असलेल्या कराइतक्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १५(ड) द्वारे "कर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

<sup>९</sup>[कर व व्याज] न भरता मोटार वाहन कब्जात किंवा नियंत्रणाखाली ठेवणे, अपुरे व खोटे प्रतिज्ञापन करणे वगैरेबद्दल शास्ती.

रकमेच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा द्रव्यदंड अशा वाहनाच्या बाबतीत देय असलेल्या वार्षिक कराच्या दुपटीइतक्या रकमेपर्यंत वाढवता येईल; [१][ * * * ]

[२][(तीन) अपराधाबद्दल दोषी ठरलेली व्यक्ती ही, ज्यावर कलम ३ च्या [३][पोट-कलम (१घ) किंवा यथास्थिति पोट-कलम (१ङ)] अन्वये वेळोवेळी कर बसविण्यात आलेला आहे अशा [४][ * * * ] [५][मोटार गाडीचा किंवा ओम्नी बसगाडीचा ] नोंदणीकृत मालक असेल तेव्हा द्रव्यदंड तीनशे रुपयाहून कमी असणार नाही आणि तो अशा वाहनाच्या संबंधात, देय असणाऱ्या एकाच वेळी द्यावयाच्या कराच्या रकमेइतका वाढविता येईल, आणि अशी व्यक्ती कलमाखालील अपराधाबद्दल पूर्वीसुद्धा दोषी ठरविण्यात आली असेल त्याप्रसंगी, द्रव्यदंड पाचशे रुपयांहून कमी असणार नाही आणि तो अशा वाहनाच्या संबंधात देय असणाऱ्या एकाच वेळी द्यावयाच्या कराच्या दुपटीएवढ्या रकमेइतका वाढविता येईल. [६][आणि];

[७][ (चार) जर ते वाहतूक वाहन असेल तर, खंड (कक) च्या तरतुदीच्या उल्लंघनाबद्दल अशा वाहनाच्या बाबतीत देय असलेल्या कराच्या पाचपट रकमेपेक्षा कमी नसेल एवढा द्रव्यदंड असेल];

(२) देणे असलेल्या [८][कोणत्याही कराची व व्याजाची] रक्कम, जणू ती द्रव्यदंडाची रक्कम आहे असे समजून वसुली योग्य असेल.

[९][(३) ज्या व्यक्तीने, कलम ३ अन्वये देणे असलेल्या कराची रक्कम आणि कलम **८क** अन्वये तिने देणे असलेले व्याज कोणतेही असल्यास ते व्याज, पूर्णपणे दिले असेल, अशा व्यक्तीविरुद्ध पोट-कलम (१), खंड (क) खालील अपराधाबद्दल कोणताही खटला भरता येणार नाही.]

[१०][(४) या कलमामध्ये किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा व्यक्तीने अशा वाहतूक वाहनाच्या बाबतीत देय असलेल्या कराच्या चारपट होईल एवढी रक्कम जर संपूर्ण भरलेली असेल तर, त्या व्यक्तीविरुद्ध पोट-कलम (१) च्या खंड (कक) अन्वये अपराध सिद्ध झाल्यास खटला भरता येणार नाही.]

---

१ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०(अ) (तीन) द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

२ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ८(क) द्वारे उपखंड (तीन) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०(अ)(तीन)(बी)(२) द्वारे "पोट-कलम (१ग)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम १०(अ)(तीन)(ब)(१) द्वारे "अशा मोटारसायकलचा, तिचाकीचा, मोटारगाडीचा किंवा ओम्नी बसगाडीचा" हा मजकूर वगळण्यात आला.

५ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २१ द्वारे "किंवा मोटारीचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०(अ)(तीन)(ब)(३) द्वारे "आणि" हा शब्द जादा दाखल करण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम १०(अ)(चार) द्वारे उपखंड (चार) जादा दाखल करण्यात आला.

८ सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १५(ब) द्वारे "कोणत्याही कराची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९ वरील अधिनियमाच्या कलम १५(क) द्वारे पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

१० सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०(ब) द्वारे पोट-कलम (४) ला पोट-कलम (५) असा नवीन क्रमांक देण्यात आला असून नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (५) च्या अगोदर पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आल.

[१][५][(५)] फाजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, महानगर दंडाधिकाऱ्याने किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याने, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीला, पोट-कलम (१) च्या खंड (तीन) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त संहितेच्या कलम २९ अन्वये, त्याला असलेल्या अधिकारापेक्षा अधिक असलेली द्रव्यदंडाची शिक्षा देणे हे कायदेशीर असेल.] १९७४ चा २.

इतर शास्ती.

**१७.** जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्या व्यक्तीला सिद्धापराधी ठरविण्यात आले असता, अशा उल्लंघनाबद्दल या अधिनियमात इतरत्र दुसऱ्या कोणत्याही शास्तीची तरतूद केली नसेल तर, ती व्यक्ती [२][ लेखी नमूद करावयाच्या विशेष कारणांसाठी असेल त्याव्यतिरिक्त, कमीत कमी पन्नास रुपये आणि जास्तीत जास्त दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि अशी व्यक्ती अशाच अपराधाबद्दल पूर्वी दोषी ठरविण्यात आली असेल तर, कमीत कमी शंभर रुपये आणि जास्तीत जास्त चारशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.]

अपराध आपसात मिटविणे.

**१८.** (१) विहित केलेल्या अधिकाऱ्यास, कलम १६, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही [३][ * * * ] दाखल केल्यानंतर, अशा अपराधाचा आरोप ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, त्या अपराधाबद्दलची तडजोड म्हणून विहित करण्यात येईल अशी रक्कम स्वीकारता येईल. मात्र, अशी रक्कम विहित केलेल्या मुदतीत भरली पाहिजे.

(२) अशा व्यक्तीने [४][कराची व व्याजाची] कोणतीही रक्कम देणे असल्यास, त्यासह अशी रक्कम भरल्यावर अशा व्यक्तीस, ती अभिरक्षेत असेल तर, मुक्त केले जाईल व अशा अपराधाच्या संबंधात अशा व्यक्तीविरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर, वरील तडजोडीमुळे ती व्यक्ती दोषमुक्त झाली आहे असे मानले जाईल व अशा व्यक्तीविरुद्ध अशा अपराधाच्या संबंधात पुढे कोणतीही फौजदारी कार्यवाही केली जाणार नाही.

अपराधांची न्यायचौकशी.

**१९.** [५][महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी] यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ८(ड) द्वारे पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आले असून सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १०(ब) द्वारे विद्यमान पोट-कलम (४) ला पोट-कलम (५) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १६(अ) द्वारे "दाखल करण्यापूर्वी किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १६(ब) द्वारे "करावी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ९ द्वारे "इलाखा शहर दंडाधिकारी किंवा पहिल्या वर्गाचा दंडाधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७४ चा २.

मोटार वाहनांवर पथकर, इत्यादी बसवण्यास प्रतिबंध.

२०. (१) मुंबईचा तरी व आंतर्देशीय जलयाने अधिनियम, १८६८ [१] * * * किंवा हैदराबाद तरी अधिनियम, किंवा उत्तर भारत तरी अधिनियम, १८७८, यात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त [२][आणि पोट-कलमे (१क), (१ख), १(ग) आणि १(घ) यातील तरतुदींच्या अधीन राहून,] या अधिनियमाच्या प्रारंभास व त्यानंतर, —

१८६८ चा मुं... हैदराबाद अधि... क्रमांक २ १३१४-फसली... १८७८ चा १...

(क) राज्य शासनला किंवा कोणत्याही स्थानिक मंडळाला कोणत्याही वाहनावर, प्राण्यावर किंवा व्यक्तीवर,

(ख) कोणत्याही इतर स्थानिक प्राधिकरणाने, कोणत्याही मोटार वाहनावर,

कोणताही पथकर बसवता येणार नाही व वसूल करता येणार नाही :

[३][ * * * * * ]

[४][(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट-कलमे (१ख), (१ग) आणि (१घ) यांच्या तरतुदींच्या अधीन राहून, राज्य शासन,—

(एक) यात याखाली खंड (क) आणि (ख) मध्ये वर्णन करण्यात आलेले कोणताही पूल किंवा कोणताही बोगदा तसेच त्यांचा पोचरस्ता किंवा रस्त्याचा कोणताही भाग किंवा कोणताही उपमार्ग यावरून किंवा यामधून जाणारी; किंवा

(दोन) ज्यांचा समूह सुनिश्चित क्षेत्रामध्ये आहे आणि राज्य शासनाकडून उक्त खंड (क) अन्वये, साकल्याने एकच म्हणून घोषित करण्यात आलेला आहे अशा कोणत्याही पुलांचा किंवा बोगद्यांचा कोणताही खंड किंवा भाग व तसेच त्यांचे पोचरस्ते किंवा रस्त्यांचे भाग किंवा उपमार्ग यावरून किंवा यामधून जाणारी,

मोटार वाहने आणि अशा मोटार वाहनांकडून ओढून नेली जाणारी अनुयाने, यांसह तसेच असे पूल, बोगदे किंवा त्यांचे पोचरस्ते किंवा रस्त्यांचे कोणतेही भाग किंवा कोणतेही उपमार्ग यांचा वापर करण्याच्या सुविधांमध्ये वाढ करण्यात आल्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे लाभ होणारी मोटार वाहने आणि अशा मोटार वाहनांकडून ओढून नेली जाणारी अनुयाने सुविधांमधील अशा वाढीचा लाभ घेत असली तरी, अशा वाहनांचा संपूर्ण भाग किंवा अशा साकल्याने एकच असलेला समूह यावरून किंवा यामधून जाणे भाग पडत नसले तरी त्यावर पथकर बसवू शकेल आणि वसूल करू शकेल.

(क) मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम, १९८७ याच्या प्रारंभानंतर राज्य शासनाच्या खर्चाने किंवा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा विधिसंस्थापित असलेल्या किंवा नसलेल्या व्यक्तींच्या निकायाच्या किंवा संघाच्या खर्चाने किंवा या दोहोंच्या खर्चाने म्हणजेच, राज्य शासन आणि कोणतीही व्यक्ती किंवा निकाय किंवा संघ [५][ किंवा राज्य शासनाने नियुक्त केलेल्या खाजगी उद्योगजकांकडून किंवा अभिकर्त्यांकडून किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या राज्य सार्वजनिक उपक्रमाकडून, असा उद्योजक किंवा अभिकर्ता याच्याशी बांधा, वापरा व हस्तांतरित करा या प्रकल्पाअन्वये करार करून ] यथास्थिति, नव्याने बांधण्यात

१९८७ चा म... १३.

---

[१] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० द्वारे "किंवा मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू असलेला तो अधिनियम" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २(अ) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(अ)(दोन) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[४] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २(१) द्वारे पोटकलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[५] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २(क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

आलेला किंवा पुनर्बांधकाम करण्यात आलेला किंवा सुधारणा करण्यात आलेला किंवा दुरुस्त करण्यात आलेला आणि ज्याचा यथास्थिति बांधकामाचा, पुनर्बांधकामाचा किंवा सुधारणेचा किंवा दुरुस्त्यांचा एकूण भांडवली खर्च दहा लाख रुपयांपेक्षा कमी नसेल असा पूल किंवा बोगदा, तसेच त्याचा कोणताही पोचरस्ता किंवा रस्त्याचा कोणताही भाग किंवा कोणताही उपमार्ग किंवा सुनिश्चित क्षेत्रामध्ये असलेला आणि राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे साकल्याने एकच असल्याच घोषित करण्यात आलेले असे पूल किंवा बोगदे तसेच त्याचे पोचरस्ते किंवा रस्त्यांचे भाग किंवा उपमार्ग यांचा समूह यांच्या संबंधात, किंवा

(ख) राज्य शासनाच्या मते जनतेला विशेष सेवा पुरविणारा असेल असा पूल किंवा बोगदा तसेच त्याचा पोचरस्ता किंवा रस्त्याचा भाग किंवा उपमार्ग यांच्या संबंधात,

पथकर बसविता येईल आणि वसूल करता येईल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी "भांडवली खर्च" या शब्दप्रयोगात सुधारणा, मजबुतीकरण, रुंदीकरण, संरचनात्मक दुरुस्त्या, देखभाल, व्यवस्थापन, प्रचालन यांसारखी विवक्षित आवश्यक चालू असलेली कामे किंवा नजीक येऊन ठेपलेली कामे यांच्यावरील अपेक्षित खर्च, वाजवी उत्पन्न आणि अशा खर्चाची संपूर्ण रक्कम वसूल करण्यात येईपर्यंत अशा खर्चावरील राज्य शासन निश्चित करील अशा दराने आकारलेले व्याज यांचा समावेश असेल.]

(१ख) [१][(क)] पोट-कलम (१क) अन्वये बसविलेला पथकर, राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करील अशा दराने व अशा कालावधीकरिता आकारण्यात येईल.

[२][(ख) राज्य शासन, पथकराचा दर आणि ज्यासाठी असा पथकर आकारण्यात येईल तो कालावधी निर्धारित करताना, एकूण भांडवली खर्च, पथकराची संभाव्य वसुली, पथकर वसूल करण्याचा खर्च आणि शासनाने किंवा यथास्थिति, राज्य सार्वजनिक उपक्रमाने, खाजगी व्यक्तीबरोबर, व्यक्तींच्या निकायाबरोबर किंवा संघाबरोबर (विधिसंस्थापित असो किंवा नसो), किंवा अभिकर्त्याबरोबर किंवा उद्योजकाबरोबर करार केला असल्यास अशा करारात निविष्ट केलेला पथकर वसूल करण्याचा कालावधी आणि अशा व्यक्तींने, निकायाने, अभिकर्त्यांने किंवा उद्योजकाने पथकराची रक्कम ठेवून घेणे यासंबंधातील तसेच, करारामध्ये निविष्ट केलेल्या कालावधीपेक्षा प्रकल्प लवकर पूर्ण केल्यास प्रोत्साहन म्हणून रोख रकमेच्या किंवा इतर कोणत्याही स्वरूपात योग्य बक्षीस देण्याच्या संबंधातील अटी व शर्ती, कोणत्याही असल्यास, विचारात घेईल :

परंतु, कोणत्याही रस्त्याचे, उपमार्गाचे, पुलाचे, बोगद्याचे, आर. ओ. बी. चे, आर. यू. बी. चे तसेच पोट-कलम (१क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, त्याचा कोणताही पोचरस्ता किंवा कोणताही उपमाग बांधकाम, पुर्नबांधकाम, सुधारणा किंवा दुरुस्ती, इत्यादी कामे करण्यासाठी बांधा, वापरा व हस्तांतरित करा या प्रकल्पांतर्गत किंवा अन्यथा शासनाने किंवा राज्य सार्वजनिक उपक्रमाने जिच्याबरोबर करार केला असेल अशी व्यक्ती किंवा व्यक्तींचा निकाय किवा संघ (विधिसंस्थापित असो किंवा नसो) किंवा खाजगी उद्योजक किंवा अभिकर्ता हे, त्यांनी दिलेल्या सेवा व लाभांबद्दल अशा पथकराची रक्कम पूर्णत: किंवा अंशत: वसूल करण्यास व ठेवून घेण्याचा हक्कदार असलेला, राज्य शासन, खंड (ख) च्या तरतुदी विचारात घेऊन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा अभिकर्ता असल्याचे मानण्यात येईल;]

---

१ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २(ख) द्वारे मूळ पोट-कलम (१ख) ला खंड **(क)** असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम २(ख) द्वारे हा खंड **(ख)** व परंतुक जादा दाखल करण्यात आला.

(१ग) राज्य शासनास स्वत: होऊन किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत, पोट-कलम (१ख) अन्वये बसविण्यात आलेला पथकर वसूल करता येईल आणि, जेव्हा अभिकर्त्यामार्फत असा कर वसूल करण्यात येईल त्या बाबतीत, असा अभिकर्ता किंवा त्याचा कर्मचारी [१][किंवा त्याचे दुय्यम अभिकर्ते ] हे, या अधिनियमान्वये पथकर वसूल करण्याचा अधिकार असलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल :

[२][ * * * ]

(१घ) विद्यमान पूल, बोगदा किंवा यथास्थिति रस्ता यांचा वापर करण्याच्या सुविधेत वाढ करण्याच्या दृष्टीने तोच प्रवाह, नदी किंवा खाडी किंवा रस्ता किंवा रेल्वे मार्ग तसेच त्याचा कोणताही पोचमार्ग यावर किंवा त्याखाली कोणताही जादा पूल किंवा बोगदा बांधण्यात आला असेल त्याबाबतीत, त्यांच्या पोचमार्गांसह असे पूल किंवा बोगदे यांचे जाळे; हे पथकर बसविण्याच्या प्रयोजनार्थ, साकल्याने एकच असल्याचे मानण्यात येईल. तथापि, [३][पोट-कलम (१ख) च्या खंड (ख) मध्ये केलेल्या तरतुदी विचारात घेऊन] असा जादा पूल किंवा बोगदा तसेच पोचमार्ग यांचा भांडवली खर्च व पथकर वसूल करण्यावरील खर्च याहून अधिक रक्कम वसूल करण्यात येणार नाही.]

[४][(१ङ) राज्य शासन, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणत्याही वाहनास किंवा वाहनांच्या वर्गास या कलमान्वये पथकर बसविला जाण्यातून सूट देऊ शकेल.]

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु [५][पोट-कलमे (१), (१क), (१ख), (१ग) आणि (१घ)] च्या व या पोटकलमाच्या तरतुदींस अधीन राहून, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, मोटार वाहनांवर कोणतेही कर लादता येणार नाहीत किंवा त्यावरील कोणत्याही करात वाढ करता येणार नाही :

परंतु, —

(क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून मोटार वाहनांवर पथकरांव्यतिरिक्त इतर जे कोणतेही कर कायदेशीररीत्या बसवण्यात येत होते ते कर राज्य विधानमंडळाकडून कायद्याद्वारे विरुध्द तरतूद करण्यात येईपर्यंत बसवणे व वसूल करणे चालू ठेवता येईल;

(ख) या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, मोटार वाहनांच्या संबंधात संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची दोन मधील ५२ व्या नोंदीखाली येणारा कर लादण्याच्या, त्यात वाढ करण्याच्या किंवा तो वसूल करण्याच्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारास बाध येणार नाही.

---

१ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २(२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २(ग) द्वारे पोट-कलम (१ग) खालील परंतुके वगळण्यात आली.

३ वरील अधिनियमाच्या कलम २(घ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २(३) द्वारे पोट-कलम **(१ङ)** जादा दाखल करण्यात आले.

५ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम २(क) द्वारे "पोट-कलम (१)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

मक्त्यात फेरबदल.

**२१.** (१) जेव्हा, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, (मुंबई तरी व आंतरदेशीय जलयाने अधिनियम, १८६८ [1][ * * * ] किंवा हैदराबाद तरी अधिनियम, किंवा उत्तर भारत तरी अधिनियम, १८७८ या व्यतिरिक्त) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही व्यक्तीस पथकर वसूल करण्याचा मक्ता देण्यात आला असेल व असा मक्ता पूर्णतः किंवा अंशतः या अधिनियमाच्या प्रारंभानंतरच्या कोणत्याही कालावधीसंबंधी असेल तेव्हा, मक्तेदाराने जी रक्कम संबंधित स्थानिक प्राधिकरणास किंवा राज्य शासनाला देण्याचा करार केला असेल ती रक्कम, हा अधिनियम अंमलात आल्यामुळे त्यास आलेल्या तोट्याच्या रकमे इतकी कमी केली जाईल.

१८६८ चा मुंबई २. हैदराबाद अधि. क्रमांक २ १३१४-फसली. १८७८ चा १२.

(२) जर अशा तोट्याच्या रकमेसंबंधी मक्तेदार व स्थानिक प्राधिकरण यांचे एकमत होऊ शकले नाही किंवा जर मक्त्याच्या करारावर या अधिनियमामुळे होणाऱ्या परिणामाविषयी त्यांच्यामध्ये कोणताही इतर विवाद उद्‌भवेल तर, अशा विवादाचा निर्णय जिल्हाधिकारी देईल आणि राज्य शासन व त्याचा मक्तेदार यांच्यामध्ये असा कोणताही विवाद उद्‌भवेल तर, त्याचा निर्णय विहित करण्यात येईल असा प्राधिकारी देईल. जिल्हाधिकाऱ्याचा किंवा यथास्थिति, विहित प्राधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण.

**२२.** या अधिनियमान्वये, सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही करता येणार नाही.

प्रत्यायोजन.

[2][**२२क.** राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व निर्बंधाच्या अधीन राहून, कराधान प्राधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे या अधिनियमाखालील त्याचे सर्व किंवा कोणतेही अधिकार, कामे व कर्तव्ये ही, मोटार वाहन विभागातील उप लेखापालाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास प्रत्यायोजित करता येतील.]

नियम करण्याचा अधिकार.

**२३.** (१) राज्य शासनाला, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषकरून व पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, राज्य शासनाला पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील :—

(क) ज्या रीतीने कर भरला जाईल ती रीत विहित करणे;

(ख) कलम ३, पोट-कलम (२) अन्वये प्रमाणित करण्याची रीत विहित करणे;

(ग) कलम ५ अन्वये [3][पावती ] व कराधान प्रमाणापत्र यांचा नमुना विहित करणे [4][आणि गहाळ, झालेल्या, नष्ट झालेल्या किंवा खराब झालेल्या [5][ * * * ] कराधान प्रमाणपत्राची प्रतिलिपी देण्यासंबंधी व त्याकरता आकारावयाच्या फीसंबंधी तरतूद करणे;]

---

[1] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे "किंवा मुंबई राज्याच्या कच्छ प्रदेशास लागू असलेला तो अधिनियम" हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३ द्वारे कलम २२क दाखल करण्यात आले.

[3] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १४(१)(एक) द्वारे "कर प्रतीक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १४(१)(एक) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[5] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १४(१)(दोन) द्वारे "कर-प्रतीकाची किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

ा मुंबई २.
' अधि.

ासली.
ा १२.

(घ) कलम ६ अन्वये प्रतिज्ञापन किंवा अतिरिक्त प्रतिज्ञापन यांचा नमुना, त्यात नमूद करावयाचा तपशील आणि ज्या वेळेत प्रतिज्ञापन सुपूर्द करण्यात येईल ती मुदत विहित करणे;

(ङ) कलम ९ अन्वये कराचा परतावा मिळवण्याबाबत ज्या रीतीने हक्क सांगता येईल त्या रीतीचे नियमन करणे;

[१][(च) कलम १० अन्वये प्रतिज्ञापनाचा नमुना, त्यात नमूद करावयाचा तपशील, अशा प्रतिज्ञापनासोबत जोडावयाचे इतर दस्तऐवज, अंतिम कर आकारणीचे प्रमाणपत्र ज्या कालावधीत आणि ज्या नमुन्यात द्यावयाचे तो कालावधी आणि तो नमुना आणि ज्या रीतीने आणि ज्या वेळेत ताफ्याच्या मालकास देणे असलेल्या कराची फरकाची रक्कम देण्यात येईल किंवा ती रक्कम परत करता येईल ती रीत आणि ती वेळ विहित करणे;]

(छ) कलम ११ अन्वये अंशदानाचे हप्ते व ते ज्या रीतीने व ज्या दिनांकास भरले जातील ती रीत व ते दिनांक विहित करणे व [२][* * * ]

[३][(छ एक) कलम १२ **ख** अन्वये ज्या नियमांच्या अधीन राहून, मोटार वाहने जप्त करता येतील व अटकावून ठेवता येतील ते नियम विहित करणे;]

[४][(ज) कराधान प्राधिकाऱ्याकडे कलम १३, पोट-कलम (३) अन्वये सूट मिळण्यासाठी ज्या नमुन्यात आणि ज्या रीतीने आणि ज्या वेळेत अर्ज करता येईल तो नमुना आणि ती रीत आणि ती वेळ विहित करणे;]

